रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३४९
www.ramprahar.com

◆ मंगळवार, ७ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग

कर्जतमध्ये उल्हास नदीचे पाणी घरांत शिरले/२

म्हाप्रळ-आंबेत पुलाला दोन बार्जची धडक/५

सुधागडातील अमनोरी येथे मध्यरात्री पूर/७

## नाशिकमध्ये ढगफुटीची भीती, प्रशासन हाय अलर्टवर



**नाशिक :** महाराष्ट्रात पावसाने रुद्र रूप धारण केले असून नाशिक जिल्ह्यासाठी ७ जुलै हा दिवस धोक्याची घंटा ठरू शकतो. हवामान विभागाने नाशिक जिल्ह्याला 'रेड अलर्ट' जारी केला असून ढगफुटीसदृश अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरपालिका हद्दीसह जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालये मंगळवारी बंद ठेवण्याचे आदेश प्रशासनाने जारी केले आहेत. त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि नाशिक शहरात पावसाचा जोर सर्वाधिक असण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने सर्व यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवले आहे. महापालिका आयुक्त मनीषा खत्री आणि जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी याबाबतचे अधिकृत आदेश जारी केले असून नागरिकांना विनाकारण घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.

# रायगडात पूरस्थिती कायम

## अनेक ठिकाणी पडझड, दुर्घटना आणि नुकसान

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे पूरस्थिती कायम आहे. पावसासोबत जोरदार वाऱ्यांमुळे मोठ्या प्रमाणावर पडझडीच्या घटना घडल्या आहेत. याशिवाय काही दुर्घटनाही घडल्या असून जीवित व वित्त हानी झाली आहे. आतापर्यंत झालेल्या पावसात सहा जण मृत्युमुखी पडले, तर पाच जण बेपत्ता आहेत.

जिल्ह्यात सुमारे २५ ठिकाणी दरडी कोसळल्या. घरांवरही दरडी कोसळल्याने तीन जण जखमी झाले. दरम्यान, १४ गावांमधील २६५ कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले आहे. जिल्ह्यात सोमवारी (दि.५) संपलेल्या २४ तासांमध्ये ३३६.६ मिमी सरासरीने पाऊस पडला. खालापूर तालुक्यात सर्वाधिक ३२३.३ मिमी पावसाची नोंद झाली. सावित्री नदीला पूर आल्यामुळे महाड बाजारपेठेत पाणी शिरले. याशिवाय अंबा, कुंडलिका, पाताळगंगा या नद्या धोका पातळीवरून वाहत होत्या.

जिल्ह्यात मागील सहा दिवस पडत असलेल्या पावसामुळे २५ ठिकाणी दरडी कोसळल्या. ७३ घरांजवळ दरड कोसळली. त्यात तीन जण जखमी झाले. दरडप्रवण कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. १४ गावांमधील २६५ कुटुबांतील ९३७ जणांना सुरक्षितस्थानी हलविण्यात आले आहे. जिल्ह्यात १४ घरांची पडझड झाली. २४२ घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले, तर सात गोठ्यांनाही हानी पोहचली आहे.

रोहा तालुक्यातील बाळसई येथील मंदिराचे नुकसान झाले. महाड तालुक्यातील विन्हेरे सुतारकोंड येथील शाळेचे नुकसान झाले. १२ खासगी दुकानांचे नुकसान झाले. याव्यतिरिक्त तीन मोठी जनावरे आणि ८६ कोंबड्या मृत्युमुखी पडल्या आहेत.

जिल्ह्यात जून महिन्याच्या सरासरी ५१.२ टक्के पाऊस पडला होता. जुलै महिन्यात ८८९.३ मिमी सरासरी पाऊस पडतो. आतापर्यंत ८९८.६ मिमी पाऊस पडला आहे. जुलै महिन्याची सरासरी पावसाने गाठली आहे. एकूण पर्जन्यमानाच्या ३९.२ टक्के पाऊस पडला आहे.

**तालुकानिहाय पडलेला पाऊस**

अलिबाग २१३.३, पनवेल २३३.३, कर्जत २३२.०, खालापूर ३२३.३, उरण २२४.३, सुधागड २६८.२, पेण २०३.५, महाड २७२.२, माणगाव २१८.०, रोहा २३६.९, पोलादपूर २४४.०, मुरूड १७८.५, श्रीवर्धन १८७.८, म्हसळा २१५.०, तळा २३५.८, सरासरी २३६.६.

## शासकीय यंत्रणा अलर्ट मोडवर, अनावश्यक प्रवास टाळा : मुख्यमंत्री



**मुंबई :** राज्यातील अतिवृष्टी आणि बदलत्या नैसर्गिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाची संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगून अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. राज्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत माहिती देताना ते विधानसभेत बोलत होते.


यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, हवामानातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या अतिवृष्टी, दरडी कोसळणे आणि जोरदार वाऱ्यासारख्या घटना या निसर्गाच्या बदललेल्या चक्राचा भाग आहेत. अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शासनाने पूर्वतयारी केली असली तरी काही वेळा अपेक्षेपेक्षा वेगळ्या घटना घडतात, परंतु या प्रत्येक परिस्थितीत स्थानिक आस्थापना, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि संबंधित सर्व विभाग रस्त्यावर उतरून तातडीने मदतकार्य करत आहेत.

नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत धोकादायक ठिकाणी त्वरित वाहतूक वळविणे, रस्ते बंद करून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित परत आणणे तसेच पाण्यात अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्यासाठी मदतकार्य सुरू असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

## पनवेलच्या धोदाणी परिसरात दोन तरुण गेले वाहून

**पनवेल : वार्ताहर**

मुसळधार पावसादरम्यान पनवेल तालुक्यातील धोदाणी परिसरात एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. वाघाचीवाडी येथे नदीपात्रात पोहत असताना दोन तरुण पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेले. यापैकी सुमित यशवंत पवार याचा मृत्यू झाला असून नयन रामा म्हात्रे बेपत्ता आहे. बुडालेले दोघेही तरुण विचुंबे गावातील रहिवासी होते.



सुमित पवार



नयन म्हात्रे

सुमारे १० जणांचा ग्रुप रविवारी नदी परिसरात मौजमजा करण्यासाठी गेला होता. मुसळधार पावसामुळे वाघाची वाडी परिसरातील नदी दुथडी भरून वाहत असताना ही दुर्घटना घडली. यावेळी इतर मित्रांनी अथक प्रयत्न करत सुमित पवार याला पाण्याबाहेर काढले. त्याला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

दरम्यान, नयन म्हात्रे हा तरुण अद्याप बेपत्ता असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलीस आणि बचाव पथकांकडून प्रयत्न सुरू आहेत, मात्र सतत सुरू असलेला मुसळधार पाऊस आणि नदीपात्रातील वाढलेला पाण्याचा प्रवाह यामुळे शोधकार्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत.

## मावळमध्ये घरावर दरड कोसळून तिघे मृत्युमुखी

**मावळ : प्रतिनिधी**



पुण्याच्या मावळ तालुक्यातील पाटण गावात सोमवारी (दि.६) पहाटे एका घरावर दरड कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत तीन जणांचा मलब्याखाली दबून मृत्यू झाला आहे.

अतिवृष्टीमुळे विसापूर किल्ल्याचा एक भाग कोसळून पाटण गावातील एक कुटुंब त्याखाली गाडले गेले. नंदू तिकोने, पत्नी आणि मुलगा घरात असताना काळाने घाला घातला. या दुर्घटनेत तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. एनडीआरएफच्या पथकाने दीर्घ शोधमोहिमेनंतर तिघांचेही मृतदेह बाहेर काढले. या हृदयद्रावक घटनेमुळे पाटण गावासह संपूर्ण मावळ तालुक्यावर शोककळा पसरली आहे. तिकोणे कुटुंबाच्या निधनाने गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## महाड तालुक्यात पावसाचे दोन बळी


**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यात मुसळधार पावसामुळे सावित्री नदीने धोक्याची पातळी ओलांडून शहरात प्रवेश केला. त्यामुळे दोन दिवसांपासून पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अशातच दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोघांचा मृत्यू झाला आहे.

टेमघर येथील धबधब्यावर गेलेल्या तिघांपैकी स्थानिक साहिल सलीम शेख (वय १९) हा पाण्यात वाहून गेला आहे. दुसऱ्या घटनेत सुधीर सुंदर देशमुख (रा. कांबळे तर्फे बिरवाडी) यांचा पुराच्या पाण्यात गटारामध्ये पडून मृत्यू झाला आहे.

## जेएनपीए बंदराला वादळाचा तडाखा

### कंटेनर अंगावर पडून कामगाराचा मृत्यू, दोघे गंभीर



**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरणमध्ये सुरू असलेल्या वादळी वाऱ्याचा फटका जेएनपीए बंदराला बसला असून न्हावाशेवा फ्रिपोर्ट टर्मिनल येथे कंटेनर अंगावर कोसळून एका १९ वर्षीय कामगाराचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना सोमवारी (दि. ६) पहाटे ३च्या सुमारास घडली.

अमितकुमार किशोर प्रसाद (वय १९, रा. मूळ बिहार) असे मृत कामगाराचे नाव आहे. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जेएनपीए बंदरातील न्हावाशेवा फ्रिपोर्ट टर्मिनल येथे उभ्या असणाऱ्या जहाजामधून रिकामे कंटेनर बंदरात तेलाच्या टँकरवर पडले. या टँकरवर काम करीत असणारे कर्मचारी कंटेनरखाली येऊन हा दुर्दैवी अपघात झाला.

मयत कर्मचाऱ्याचा मृतदेह उरण शहरातील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला असून तेथे शवविच्छेदन करण्यात येणार आहे, तर गंभीर जखमी दोन कामगारांना रुग्णालयात हलविण्यात आले असून वैद्यकीय पथक त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. या घटनेची नोंद न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## निवडक

### भिवंडी, अहिल्यानगरमध्ये दोन मुलांचा पावसात मृत्यू

**ठाणे, अहिल्यानगर :** भिवंडी शहरात १३ वर्षीय मुलगा नाल्यात वाहून गेल्याची घटना घडली असून अहिल्यानगरमध्ये विद्युत खांबाला स्पर्श झाल्याने एका चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. भिवंडीत मित्रांबरोबर खेळायला गेलेला मोहम्मद अबुजर अन्सारी (वय १३) हा मुलगा पावसाच्या पाण्यामुळे नाल्यात वाहून गेला. त्याचा शोध सुरू आहे, तर अहिल्यानगर स्टेशन रोड परिसरात विद्युत खांबाला स्पर्श झाल्याने चार वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाला. प्रियंका गांगर्डे असे तिचे नाव आहे.

### लोणावळ्यातील पर्यटनस्थळांवर ३१ जुलैपर्यंत प्रशासनाचे निर्बंध

**पुणे :** मुसळधार पावसामुळे लोणावळा परिसरासह मावळ तालुक्यात परिस्थिती धोकादायक बनली आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी लोणावळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पर्यटकांसाठी ३१ जुलैपर्यंत निर्बंध लावले आहेत. त्यानुसार पर्यटकांना धबधब्याच्या ठिकाणी किंवा धोकादायक पॉईंटवर जाता येणार नाही. त्याचप्रमाणे सेल्फी, व्हिडीओ शूटिंगला मनाई आहे.

## ‘इंद्रायणी’ला पूर! आळंदीत अडकलेल्या ४०८ वारकऱ्यांची सुखरूप सुटका

**आळंदी : प्रतिनिधी**



सततच्या पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली असून नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे आळंदी शहरात पूरसदृश गंभीर परिस्थिती निर्माण झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, पोलीस, अग्निशमन दल आणि स्थानिक यंत्रणांनी युद्धपातळीवर बचावकार्य राबवत ४०८ वारकऱ्यांची सुखरूप सुटका आहे.

प्राथमिक माहितीनुसार शहरातील विविध धर्मशाळा, दर्शन मंडप आणि इतर ठिकाणी अडकलेल्या वारकरी आणि नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. बचाव पथकांनी अहोरात्र परिश्रम करत मुख्य ज्ञानेश्वरी मंदिर परिसरातून २२०, इंद्रायणी नगरी भागातून १००, ठाकूरबुवा मंडप येथून ६० आणि गोपाळपुरा परिसरातून २८ अशा एकूण ४०८ भाविकांची सुरक्षित सुटका केली.

नागरिकांच्या आणि वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने इंद्रायणी नदीवरील चार महत्त्वाचे पूल तात्पुरते वाहतुकीसाठी बंद केले आहेत तसेच नदीकाठ, नदीपात्र आणि पुलांवर जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

## कशेडी घाटात दरड कोसळून वाहतूक प्रभावित

**पोलादपूर : प्रतिनिधी**



पोलादपूर-महाबळेश्वरला जोडणाऱ्या बंद आंबेनळी घाटरस्त्यावर दरडी कोसळत असतानाच रविवारी रात्री मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटातील भुयारी मार्गापलीकडे पोलीस चौकीलगत महाकाय दरड कोसळून येथील वाहतूकही ठप्प झाली. यंत्रणांच्या अथक प्रयत्नांनंतर वाहतूक १४ तासांनी येथील वाहतूक पूर्ववत झाली.

याशिवाय पोलादपूर तालुक्यातील दुर्गम क्षेत्रपाळ गावाबाहेर मध्यरात्रीच्या सुमारास उंच डोंगरावरून दरड कोसळली. सुदैवाने ती गावठाणाबाहेरच राहिल्याने कोणतीही जीवित व वित्त हानी झाली नाही. दरम्यान, सोमवारी सकाळी ६ वाजेपर्यंत तालुक्यात २६५ मिमी पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे कामथी, ढवळी, घोडवनी, चोळई, सावित्री या पाचही नद्या तुडुंब वाहत होत्या.

### ‘मिसिंग लिंक’वर दरड कोसळली

**पुणे :** मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेच्या ‘मिसिंग लिंक’वर सोमवारी (दि.६) पहाटे ३.३० वाजता दरड कोसळली. यानंतर लगेचच वाहतूक थांबवण्यात आली. याबाबतची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

यानंतर पत्रकारांशी बोलताना मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले की, ‘मिसिंग लिंक’वरील बोगद्याचा दर्शनी भागावर आलेली दरड हटवण्याचे काम सुरू आहे. बराचसा भाग दूर करण्यात आलेला आहे. हे सर्व काम झाल्यावर वाहतूक कधी सुरू करायची याचा निर्णय येथील पोलीस घेतील, कारण हा प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न आहे.

### खंडाळा घाटात दरडीमुळे सहा एक्स्प्रेस रद्द

**कर्जत :** खंडाळा, मंकी हिल आणि ठाकूरवाडीदरम्यान मुसळधार पावसामुळे रेल्वे रूळांवर अनेक ठिकाणी दरड, माती आणि दगड कोसळल्याने मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मध्य रेल्वेने या घाट विभागातील वाहतूक तात्पुरती बंद केली असून सोमवारी पुणे-मुंबई मार्गावरील सहा महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या.

कर्जत रेल्वेस्थानक प्रशासनाच्या माहितीनुसार हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस आणि साईनगर सातारा एक्स्प्रेस या दोन गाड्या कर्जत येथे थांबविण्यात आल्या होत्या. रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी शिरीष कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पहाटेपर्यंत अडकलेल्या प्रवाशांची व्यवस्था करण्यात आली. **(सविस्तर पान २ वर..)**

## मोरबे धरण ओव्हरफ्लो!



**पनवेल : सततच्या पावसामुळे मोरबे धरण ओव्हरफ्लो झाले असून भिंतीवरून पाणी वाहत आहे. जवळपास ५० एकर जमिनीवर वसलेल्या या धरणाची पाणी क्षमता ३.२२ दशलक्ष घनमीटर आहे. धरण ओसंडून वाहू लागल्याने आजूबाजूच्या गावांची पाण्याची चिंता मिटली आहे.**

## ताम्हिणी घाट वाहतुकीसाठी बंद

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे आणि रायगड जिल्ह्यांना जोडणारा ताम्हिणी घाट जोरदार पावसामुळे खचला आहे. त्यामुळे येथील वाहतूक बंद झाली आहे.

ताम्हिणी घाटात मुळशी तालुक्याच्या हद्दीत शंकराच्या मंदिरापासून तीनशे मीटर अंतरावर अतिवृष्टीमुळे रस्ता खचला. त्यामुळे पुण्याकडून कोलाडच्या दिशेने येणारी आणि कोलाडकडून पुण्याच्या दिशेने जाणारी वाहतूक बंद करण्यात आली आहे. याशिवाय महाडकडून पुण्याला जाणारा वरंधा घाट दरडी कोसळल्याने बंद करण्यात आला आहे, तर पोलादपूरकडून महाबळेश्वरकडे जाणारा आंबेनळी घाटमार्ग दरडी कोसळत असल्याने वाहतुकीसाठी बंदच आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणाला जोडणारे तीन प्रमुख मार्ग बंद झाले आहेत.

## थोर नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्मरण पंधरवड्यानिमित्त कार्यकर्ता संमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




भारतीय जनसंघाचे संस्थापक, थोर राष्ट्रीय नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २३ जून ते ६ जुलैदरम्यान स्मरण पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने पनवेलच्या खांदा कॉलनीतील सीकेटी कॉलेजमध्ये कार्यकर्ता संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष अतुल कळसेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या संमेलनात कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना प्रदेश उपाध्यक्ष अतुल कळसेकर आणि प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाची मूळ विचारधारा, संघटनात्मक बळकटीकरण आणि जनसेवेच्या संकल्पनेला तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्याबाबत सविस्तर संवाद साधला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशाचे राष्ट्रहित, राष्ट्रीय एकात्मता आणि अखंड भारताच्या संकल्पनेसाठी दिलेले सर्वोच्च योगदान प्रत्येक भारतीयासाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे नेत्यांनी यावेळी अधोरेखित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत आगामी काळात समाजहित आणि राष्ट्रहितासाठी अधिक समर्पित भावनेने कार्य करण्याचा दृढ संकल्प यावेळी सर्व उपस्थितांनी व्यक्त केला.

या संमेलनाला भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्यासह उत्तर रायगड जिल्ह्यातील पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, आजी माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणांनी अलर्ट मोडवर मदतकार्य करावे -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग ५० ते ७० किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच सोमवारी दुपारी ३ ते ४.३० वाजे दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी २४ बाय ७ अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.




राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई आणि किनारी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस अपेक्षित आहे. अपेक्षित उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना 'अलर्ट मोड'वर ठेवण्यात आले आहेत. पुराची परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने 'एसडीआरएफ' आणि 'एनडीआरएफ' ची पथके रवाना करण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तातडीने मदत मिळेल, याची काळजी घ्यावी.

मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून महामार्गावरील मलबा हटविण्यात यावा. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य दरड कोसळणाऱ्या ठिकाणी पथके सज्ज ठेवावीत. तसेच मुंबई–गोवा महामार्गावर यावेळी अनपेक्षित ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून दरडीचा मलबा तात्काळ हटविण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

अरबी समुद्रावर बनत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात उद्या ढगफुटी सदृश्य पाऊस होण्याची दाट शक्यता आहे. हा पाऊस बऱ्यापैकी त्र्यंबकेश्वर व आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे ३०० मिलिमीटर पाऊस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. कुठेही जीवित हानी होणार नाही, याबाबतही दक्ष रहावे.

ही परिस्थिती लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी. बंद होऊ शकणारे रस्ते, दरडी कोसळण्याची ठिकाणी अशा सर्वंकष बाबींचा विचार करून पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पुढील काही दिवस त्र्यंबकेश्वर परिसरामध्ये पर्यटकांनी जावू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

सर्व यंत्रणांनी अत्यंत सतर्क राहून अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. पुढील ४८ तास 'शून्य बळी' हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुंबई शहरात एका महिन्याच्या सरासरी इतका पाऊस अवघ्या चार दिवसांत नोंदवण्यात आला आहे. विशेषतः भरतीच्या काळात अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर आपत्तीजन्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रित ठेवण्यात यश आले आहे. काल मुंबई शहरात ताशी ५० किलोमीटर वेगाने वारे वाहताना निदर्शनास आले. यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. साधारणपणे संपूर्ण चार महिन्यांच्या मान्सूनमध्ये जितकी झाडे पडतात, त्यापैकी जवळपास ३०० झाडे एकाच दिवशी पडली आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

येत्या तीन दिवसांत, म्हणजे ८ जुलैच्या रात्रीपर्यंत, हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. सर्व जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे. दरम्यान, भूस्खलनाच्या घटनाही समोर आल्या आहेत. मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

अशा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करावा. खाजगी आस्थापनांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांना वर फ्रॉम होम सवलत द्यावी असे न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त यांच्याकडून संबंधित विभागाचा आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, प्रधान सचिव (नगरविकास) के. एच. गोविंदराज, प्रधान सचिव (जलसंपदा) एकनाथ डवले,मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल उपस्थित होते.

# कर्जतला पावसाने झोडपले

## उल्हास नदीचे पाणी अनेक घरांत घुसून नुकसान



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात काल रात्रीपासून पावसाने कहर केला असून उल्हास नदी ठीक ठिकाणी उलटल्याने अनेक गावात पाणी शिरले. पहाटेच्या सुमारास कर्जत शहरातील अनेक भागात पाणी शिरल्याने ऐन झोपेत असलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. घरात दीड ते दोन फूट पाणी भरल्याने नुकसान झाले. त्यातच वीज प्रवाह खंडित झाल्याने अनेकांना काळोखातच सामान हलवण्याची वेळ आली. सकाळी साधारण अकरा नंतर मोबाईलचे नेटवर्क बंद झाल्याने अनेकांना संपर्क करण्यास अडचणी निर्माण झाल्या.

काल पासून सुरु झालेला पाऊस सातत्याने वाढतच गेला. रात्री धुवाधार पाऊस सुरु झाल्याने पहाटे साडे तीनच्या सुमारास उल्हास नदीचे पात्र कोतवाल नगर मधील राष्ट्रवादी संपर्क कार्यालया समोरच्या रस्त्यावर उलटले. त्यानंतर मुद्रे बुद्रुकच्या रस्त्यावर उलटले. त्यामुळे कोतवाल नगर, मुद्रे बुद्रुक मधील महसूल वसाहतीत पाणी शिरले. सुमारे दीड ते दोन फुटपर्यंत घरा – घरात पाणी शिरले. तत्पूर्वीच वीज प्रवाह खंडित झाल्याने ऐन झोपेच्या वेळेस नागरिकांची तारांबळ उडाली. पळसदरी ठाकुरवाडी येथे दरड कोसळल्याने पाच वाहनांचे नुकसान झाले.

काही ठिकाणचे नदीवरील पूल व साकव दोन दिवस पाण्याखाली होते. त्यामुळे त्यावरील रहदारी बंद करण्यात आली. नानामास्तर नगर ते मालवाडी कडे जाणाऱ्या रस्त्यावरील साकवा वरून पाणी गेले. आज सोमवार असल्याने चाकरमानी नोकरीसाठी निघाले असता पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या बहुतांशी एक्सप्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या. तसेच लोकल सेवाही विस्कळीत झाल्याने ते जाऊ शकले नाहीत. शाळा महाहाविद्यालयांना सुटी जाहीर केल्याने विद्यार्थ्यां व शिक्षकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

पाऊस उशिरा सुरु झाल्याने भाताच्या पेरण्या उशिरा झाल्याने तीन – चार इंच आलेली भात रोपे पाण्याखाली गेल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. आता पुन्हा कधी पेरणी करायची आणि पीक कधी तयार व्हायचे या विवानचनेत शेतकरी वर्ग आहे.

# आपत्तीग्रस्त गावांची सभापती कृष्णा पारंगे यांच्याकडून पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील बीड आदिवासी वाडी आणि बौद्धवाडी हे आपत्तीग्रस्त गावे असून सद्या तुफान पडणाऱ्या पावसात तेथील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामस्थ यांच्याबरोबर चर्चा केली.



सद्या डोंगराळ भागासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. हा भाग दरड प्रभाव भागात आहे.पावसामुळे दरड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. खालापूर तालुक्यातील बीड ग्रामपंचायत हद्दीतील बीड गावालगत असणाऱ्या डोंगराचा मातीचा भाग कोसळला असून त्याचा फटका बीड आदिवासी वाडी, बीड बौध्दवाडा व बीड गावातील नागरिकांना बसला असून नागरिक जीव मुठीत घेऊन भीतीच्या वातावरण जगत आहेत.बीड ग्रामपंचायत हद्दीत डोंगरावरून मातीचे ढीग खाली आल्याचे सभापती कृष्णा पारंगे यांना समजताच त्यांनी त्या ठिकाणी तात्काळ भेट देऊन नागरिकांशी संवाद साधून त्यांना सुरक्षीत ठिकाणी राहण्याची व्यवस्था केली.

यावेळी, पंचायत समिती सदस्य रितेश जाधव,ग्रामसेवक संतोष पवार,सामाजिक कार्यकर्ते प्रशांत खांडेकर,सरपंच भाऊ पवार ,सदस्य लवेश कर्नूक ,सदस्य आकाश केदारी ,राकेश पाटील ,कल्पेश कर्णूक ,रोहित कर्णूक,गणेश केदारी ,अनंता केदारी ,राहुल केदारी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# क्रांतिकारक हुतात्म्यांच्या सन्मानासाठी जिल्हा परिषदेचे एक पाऊल पुढे असणार -अध्यक्ष मंगेश वाकडीकर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात ८४ गावात आगरी समाज असून प्रत्येक गावातील आगरी समाज हा समाज संघटनेसोबत संलग्न आहे ही मोठी गौरवाची बाब आहे. त्यामुळे या समाजातील देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात योगदान देणारे क्रांतिकारक आणि हुतात्म्यांचा सन्मान करणे ही रायगड जिल्हा परिषदेची जबाबदारी राहील. शिक्षण घेऊनच पुढे गेले पाहिजे,त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श आपण सर्वांनी ठेवले पाहिजे. त्याचे कारण त्यांनी वयाच्या सातव्या वर्षी शिक्षण घेण्यास आपले घर सोडले आणि आज शिवाजी महाराज विश्वाचे राजे झाले आहेत. आगरी समाज संघटना यांच्या मागणीनंतर



आगरी समाज हॉल समोरील रस्ता आणि सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटार बांधण्यासाठी दहा लाखाचा निधी देत आहे.' असे रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी जाहीर केले.


तालुक्यातील माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय मध्ये ८० टक्के हून अधिक गुण मिळवणारे विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा नेरळ बोपेले येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर,जिल्हा परिषद सदस्य पक्ष प्रतोद बाबू घारे, माजी पक्ष प्रतोद सावळाराम जाधव, संघटनेचे माजी अध्यक्ष एकनाथ धुळे, भरत भगत, पंचायत समितीचे सदस्य महेश विरले, समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, संस्थापक सदस्य शरद भगत, सूर्यकांत चंचे, उद्योजक नरेश जोशी, संदेश हजारे, माथेरानचे नगरसेवक किरण पेमारे, शिवसेना ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख बाजीराव दळवी, भाजप जिल्हा ओबीसी अध्यक्ष राजेश भगत, राष्ट्रवादी महिला तालुका अध्यक्ष ॲड रंजना धुळे, तसेच संघटनेचे उपाध्यक्ष भगवान धुळे, शिवाजी कराळे, सचिव जितेंद्र गवळी, खजिनदार भूषण पेमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी संघटनेच्या माध्यमातून होत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमात दहावी आणि बारावी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कर्जत तालुक्यात दहावी मध्ये ९७ टक्के गुण मिळवून प्रथम आलेल्या सायली शशिकांत मुंढे हिचा विशेष सत्कार समाज संघटना तसेच कै.श्रध्दा सूर्यकांत चंचे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

वाकडीकर पुढे म्हणाले, 'समाज संघटनेकडून भविष्य काळात उभारण्यात येणाऱ्या अभ्यासिका आणि वस्तीगृह उभारणीत रायगड जिल्हा परिषद कडून काही मदत करता येईल काय? याबाबत माहिती घेऊन सहकार्याची भावना असेल. हुतात्मा हिराजी पाटील यांचे नाव मानिवली येथील जिल्हा परिषद शाळेचे नामकरण विषयी दिवसात निर्णय घेऊ.'

# आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानकाजवळ मलबा कोसळला

## नवी मुंबई मेट्रो सेवा सुरळीत



**नवी मुंबई : बातमीदार**

मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे रविवारी (५ जुलै) सकाळी सुमारे ८.३० वाजता नवी मुंबई मेट्रो लाईन–१ वरील आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक (स्टेशन क्र. २) परिसरात झाडासह दगड–मातीचा मलबा कोसळण्याची घटना घडली.सततच्या मुसळधार पावसामुळे आणि वादळी वाऱ्यांमुळे परिसराच्या भौगोलिक रचनेवर परिणाम होऊन हा मलबा कोसळल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही तसेच खासगी किंवा सार्वजनिक मालमत्तेचे कोणतेही नुकसान झालेले नाही. कोसळलेला मलबा रस्त्यालगतच्या पदपथावर पडला. संबंधित पदपथ आधीपासूनच संरक्षक कुंपण घालून पादचाऱ्यांसाठी बंद करण्यात आला होता.

घटनेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून रस्त्याचा प्रभावित भाग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन पथकांनी संयुक्तपणे घटनास्थळी पोहोचून परिसर सुरक्षित केला आणि मलबा हटविण्याची कारवाई केली. तसेच या घटनेची माहिती पनवेल महानगरपालिकेलाही देण्यात आली आहे.

सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित ठिकाणी जीआय पत्र्यांचे तात्पुरते बॅरिकेडिंग उभारण्यात येत असून, प्रभावित रस्त्यावरील एक लेन पुढील काही काळ वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.दरम्यान, नवी मुंबई मेट्रो लाईन–१ वरील रेल्वे सेवा पूर्णपणे सुरळीत सुरू असून आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानकासह सर्व शेजारील स्थानकांवरून प्रवाशांना कोणत्याही अडथळ्याशिवाय प्रवास करता येत आहे.

# महापौर सुजाता पाटील यांनी केली दुर्घटना स्थळांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळी कालावधीतील क्षेत्रीय स्तरावरील स्थितीचा प्रत्यक्ष आढावा फिल्डवर जाऊन घेताना नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी शहाबाज बेलापूर व जुहूगाव वाशी या ठिकाणी घडलेल्या इमारत दुर्घटना स्थळांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व तेथील रहिवाशांशी संवाद साधून त्यांना दिलासा देत आवश्यक कार्यवाही तत्परतेने करण्याचे निर्देश महापालिका अधिकाऱ्यांना दिले.यावेळी वाशी विभागाचे सहा.आयुक्त .सुखदेव येडवे व कार्यकारी अभियंता पंढरीनाथ चौडे व इतर अधिकारी उपस्थित होते.



महापे एमआयडीसी येथील पोलीस चौकीसमोर रस्त्यावर मोठया प्रमाणात पाणी साचलेल्या ठिकाणाचीही पाहणी करत त्याठिकाणी सुरु असलेल्या जेसीबीने नाल्याचे पात्र मोठे करण्याच्या कामाला वेग दयावा असे महापौरांनी कोपरखैरणे विभागाचे सहा.आयुक्त भरत धांडे यांना निर्देश दिले. ठाणे बेलापूर रोडवरील स्थितीची दिघ्यापर्यंत पाहणी करत ग्रीनवर्ल्ड नाल्यातील प्रवाहाचीही महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी उपमहापौर दशरथ भगत यांच्यासह पाहणी केली.

पाहणी दौऱ्यात तीन दिवसातील मुसळधार पावसात मोठया प्रमाणात वादळी वाऱ्यामुळे झाडे पडण्याच्या घटना सर्वत्र घडल्या असून पडलेली झाडे उचलून नेण्याचे काम जलद गतीने करावे असेही निर्देशित करण्यात आले.नवी मुंबईकर नागरिकांनी वादळी वाऱ्यासह पाऊस पडत असल्याने आत्यंतिक महत्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडू नये तसेच झाडाखाली उभे राहू नये व झाडाखाली आपली वाहने उभी करु नयेत. त्याचप्रमाणे अडचणीच्या प्रसंगी मदत कार्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी १८००२२२३०९ / या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा

# कर्जत पळसदरी-ठाकूरवाडीत दरड कोसळली; रहिवाशांचे स्थलांतर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पळसदरी – ठाकूरवाडी येथे सोमवारी पहाटे दरड कोसळून पाच वाहनांचे नुकसान झाले. या दुर्घटनेत दोन चारचाकी आणि तीन दुचाकी वाहने मातीत अडकून त्यांची हानी झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

डोंगरावरील वस्तीला जाणाऱ्या रस्त्यावर वाहने जाऊ शकत नसल्याने नागरिकांनी रस्त्यालगत शेडमध्ये ही वाहने उभी केली होती. पहाटे अचानक दरड कोसळल्याने मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले. त्यामुळे वस्तीकडे जाणारा रस्ता पूर्णपणे बंद झाला असून काही ठिकाणी



रस्त्याचाही भाग खचला आहे. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले. प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, मंडल अधिकारी वैशाली पाटील, तलाठी शितल मंदाडे, ग्रामसेवक अनिल राठोड, पोलिस सहाय्यक उपनिरीक्षक शरद रोकडे यांच्यासह पोलिस कर्मचारी आणि स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले.

जेसीबीच्या सहाय्याने दरडीचा मलबा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून ठाकूरवाडीतील रहिवाशांना खबरदारीचा उपाय म्हणून पळसदरी मठामध्ये सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात येत आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# खंडाळा घाटात दरड कोसळल्याने मुंबई–पुणेकडे जाणाऱ्या सहा एक्स्प्रेस रद्द



**कर्जत : प्रतिनिधी**

खंडाळा – मंकी हिल – ठाकूरवाडी दरम्यान मुसळधार पावसामुळे रेल्वे रुळांवर अनेक ठिकाणी दरड, माती आणि दगड कोसळल्याने मुंबई – पुणे रेल्वे मार्गावरील वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मध्य रेल्वेने या घाट विभागातील वाहतूक तात्पुरती बंद केली असून सोमवारी पुणे – मुंबई मार्गावरील सहा महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या.

कर्जत रेल्वे स्थानक प्रशासनाच्या माहितीनुसार, हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस आणि साईनगर सातारा एक्स्प्रेस या दोन गाड्या कर्जत येथे थांबविण्यात आल्या होत्या. त्यानंतर रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी शिरीष कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रीपासून पहाटेपर्यंत अडकलेल्या प्रवाशांची व्यवस्था करण्यात आली. पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाशी समन्वय साधून बसची व्यवस्था करण्यात आली तर मुंबईकडे जाणाऱ्या प्रवाशांना संबंधित गाड्यांद्वारे परतीच्या मार्गाने रवाना करण्यात आले.परिस्थिती लक्षात घेऊन कर्जतसह परिसरातील सर्व रेल्वे स्थानकांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.

**रद्द केलेल्या गाड्या :**
२२१०५ मुंबई –पुणे इंद्रायणी एक्स्प्रेस
१२१२७ मुंबई –पुणे इंटरसिटी एक्स्प्रेस
११००७ मुंबई –पुणे डेक्कन एक्स्प्रेस
१२१२३ मुंबई –पुणे डेक्कन क्वीन
१२१२५ मुंबई–पुणे प्रगती एक्स्प्रेस
११०११ मुंबई–धुळे एक्स्प्रेस


## संपादकीय

# नव्या पर्वाची नांदी

दोन शतकांचा वैभवशाली वारसा असलेल्या मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या अध्यक्षपदी शनिवारी भाजपचे माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांचा विजय झाला. सहस्त्रबुद्धे यांच्या एशियाटिक टुमारो गटाचे सर्व १९ उमेदवार मोठ्या फरकाने या निवडणुकीत विजयी झाले. यंदाच्या निवडणुकीने या दोनशेहून अधिक वर्षांची परंपरा लाभलेल्या संस्थेचे निव्वळ नेतृत्व बदलले नाही तर देशातील बौद्धिक विश्वातही बदलत्या विचारप्रवाहाची स्पष्ट नोंद करून दिली आहे.

**ज्ञानाचे केंद्र अशी ओळख असलेल्या एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईची रखडलेली निवडणूक अखेर शनिवारी पार पडली. निवडणुकीत डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या नेतृत्वाखालील एशियाटिक टुमॉरो पॅनेलने अध्यक्ष पदासह उपाध्यक्ष, सचिव, व्यवस्थापन समिती आणि इतर प्रमुख पदांवर दणदणीत विजय मिळवत संस्थेच्या सदस्यांनी कोणत्या दिशेने विश्वास व्यक्त केला आहे हे स्पष्ट केले. गेली अनेक दशके देशातील बहुतेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि संशोधन संस्थांवर विशिष्ट विचारसरणीचा प्रभाव असल्याची टीका होत होती. राष्ट्रवाद, भारतीय परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांचा अभ्यास हा त्यामुळे दुय्यम ठरत असल्याची भावना अनेक अभ्यासकांनी व्यक्त केली होती. अशा पार्श्वभूमीवर एशियाटिक सोसायटीच्या सदस्यांनी आता बदलाच्या बाजूने कौल दिला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळेच ही घटना केवळ या एका निवडणुकीपुरती मर्यादित राहत नाही. एशियाटिकच्या निवडणुकीचा निकाल हा एका संस्थेतील सत्तांतरापेक्षा अधिक व्यापक संदेश देणारा आहे. देशातील बौद्धिक क्षेत्रात भारतीय दृष्टिकोनाला वाढते स्थान मिळावे, आपल्या इतिहासाचे मूल्यमापन भारतीय नजरेतून व्हावे आणि ज्ञानसंस्था समाजाशी अधिक जोडल्या जाव्यात अशी अपेक्षा या निकालातून व्यक्त झालेली दिसते. आता या विश्वासाचे रूपांतर ठोस कामगिरीत करण्याची जबाबदारी नव्या नेतृत्वावर आहे. त्या कसोटीवर ते कितपत यशस्वी ठरतात याकडे संपूर्ण बौद्धिक विश्वाचे लक्ष असेल. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्यासह निवडून आलेल्या पथकात शिक्षण, साहित्य, इतिहास, चित्रपट, संस्कृती आणि सार्वजनिक जीवनातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश आहे. निवडणुकीतून झालेल्या बदलामुळे या संस्थेच्या भावी वाटचालीकडे नव्या अपेक्षेने पाहिले जात आहे. विशेषतः भारतीय ज्ञानपरंपरा, प्राचीन हस्तलिखितांचे संवर्धन, दुर्मीळ ग्रंथांचे डिजिटायझेशन, संशोधनाला आधुनिक दिशा आणि सामान्य नागरिकांचा संस्थेतील वाढता सहभाग या मुद्यांना प्राधान्य मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. ही निवडणूक आणखी एका कारणाने महत्त्वाची ठरते. वैचारिक संघर्ष हा लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे. मतभिन्नता असू शकते. परंतु अंतिम निर्णय सदस्यांचा असतो. एशियाटिकच्या सदस्यांनी मतदानाद्वारे स्पष्ट संदेश दिला आहे की संस्थांचे नेतृत्व व्यक्तीपेक्षा दृष्टीकोनावर ठरते. राष्ट्रहित, भारतीय अस्मिता आणि सांस्कृतिक आत्मविश्वास यांना केंद्रस्थानी ठेवणाऱ्या नेतृत्वाला त्यांनी संधी दिली आहे. अर्थात विजयासोबत जबाबदारीही वाढते. एशियाटिक सोसायटी ही कोणत्याही एका राजकीय विचारसरणीची संस्था नसून संपूर्ण समाजाची बौद्धिक संपदा आहे. त्यामुळे नव्या नेतृत्वाने सर्व अभ्यासकांना समान संधी देत संशोधनातील गुणवत्ता, पारदर्शकता आणि संस्थेची शैक्षणिक प्रतिष्ठा अधिक उंचावणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या राजकीय पक्षपातापासून दूर राहून, वैचारिक अस्पृश्यतेला फाटा देत या संस्थेला गतवैभव प्राप्त व्हावे या भावनेने आम्ही काम करू असे डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी विजयानंतर म्हटले आहे. मतभेद असले तरी संवादाची दारे उघडी ठेवणे हीच भारतीय परंपरेची ताकद आहे.**

# शेतकऱ्यांच्या विकासाचा नवा अध्याय!




महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना सातत्याने नैसर्गिक आपत्तींनी छळले आहे. राज्यात व्यापक प्रमाणात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या असल्या, तरी शेतीचा मोठा भाग पर्जन्यपोषित आहे. त्यामुळे खरीपाच्या (आणि रब्बीच्याही) उत्तम हंगामासाठी पर्जनमान हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. अर्थात, चांगला पाऊस पडूनही अनेकदा कीडींच्या प्रादुर्भावाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. या समस्या सुटल्यावर काहीवेळा अवकाळी पावसाचा फटका बसल्यावर हातचे पीक गमावण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढवते. पीक चांगले आल्यावर शेतीमालाच्या दरांचा प्रश्नही सातत्याने भेडसावत असतो. शेतकऱ्यांवर येणाऱ्या अशा विविध स्वरुपाच्या संकटांचा विचार करून राज्य शासनाने वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे.

### कर्जमुक्ती योजनेचा निर्णय

राज्य सरकारने अलिकडेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. २०१७मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळी थेट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती जाहीर करण्यात आली असून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

अल्पमुदतीची थकीत पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांचा या योजनेत समावेश आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे कर्जाची रक्कम या मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या शेतकऱ्यांनाही स्वतःच्या हिस्स्याची रक्कम भरल्यावर दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचे लाभ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलाय. यामुळे शेतकरी पीककर्जासाठी अक्षम ठरणार नाहीत, याची काळजी घेण्यात आली आहे.

### 'त्या' शेतकऱ्यांनाही लाभ

कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही राज्य सरकारने प्रोत्साहनपर दिलासा दिला असून अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद या योजनेत आहे. नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

### कल्याणकारी योजनांची जोड

राज्य सरकारचे कृषी धोरण शेतकरी केंद्रित आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, या त्रिसूत्रीवर कृषी विभागाच्या नेतृत्वात विविध योजना राबविल्या जात आहेत. सिंचन सुविधांचा विस्तार, ठिबक व तुषार सिंचनाला प्रोत्साहन, पीकविमा, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि शेततळ्यांच्या उभारणीसाठीही विविध योजनांद्वारे आर्थिक सहाय्य दिले जात आहे. ऊर्जेच्या खर्चात बचत व्हावी आणि दिवसा अखंडित वीज उपलब्ध व्हावी, यासाठी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' महत्त्वाची ठरली आहे. या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर सौर पंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, सिंचनासाठी शाश्वत ऊर्जेचा वापर वाढविण्यावर भर दिला जातोय.

### कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान सातत्याने प्रगतीची शिखरे गाठत असताना शेतीचे क्षेत्रही त्यातून सुटलेले नाही. शेतीसाठी लागणारे मानवी श्रम तुलनेने कमी व्हावे आणि शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचे 'स्मार्ट' पर्याय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने 'एआय' म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या प्रसारवर मोठा भर दिला आहे. पीकांची लागवड, कीडींचे व्यवस्थापन, खत व पाण्याचे अचूक नियोजन, फवारणी, बाजारभावांचे अचूक विश्लेषण, पर्यायी बाजारपेठांची उपलब्धता, हवामानविषयक माहिती अशा अनेक बाबतीत आता 'एआय' साधने राज्यात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होत आहेत. याशिवाय शेतमाल साठवणूक, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन, तसेच डिजिटल सेवांद्वारे शासकीय योजनांची माहिती आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांचा संगम साधत शेतीला अधिक सक्षम, स्पर्धात्मक आणि शाश्वत स्वरूप देण्याचे प्रयत्न राज्य शासनाकडून सुरु आहेत. कर्जमुक्तीपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा हा प्रवास महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र आणि पर्यायाने शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याच्या व्यापक प्रयत्नांचे द्योतक मानला जात आहे.

ही योजना केवळ एक कर्जमाफीची वा कर्जमुक्तीची घोषणा नाही, तर तंत्रज्ञानाची अचूक जोड देऊन राबवली जाणारी एक ऐतिहासिक मोहीम आहे. या पारदर्शक पद्धतीमुळे मध्यस्थांचा सुळसुळाट थांबेल आणि आर्थिक मदत थेट शेतकऱ्याच्या खात्यात जमा होईल. आता गरज आहे ती फक्त एकाच गोष्टीची-शेतकऱ्यांनी जागरूक राहून आपले डिजिटल प्रमाणीकरण वेळेवर पूर्ण करण्याची ! तरच या ऐतिहासिक योजनेचा खरा उद्देश सफल होण्यास मदत होईल.

आपला देश मौसमी हवामानाच्या प्रदेशात आहे आणि बदलते ऋतूचक्र आणि वेळोवेळी येणारी नैसर्गिक आव्हाने झेलत शेती करणे अतिशय कष्टाचे काम आहेच सोबतच लहरी निसर्गाने अवेळी येणारा पाऊस, अतिवृष्टी तर कधी गारपीट याने पेरलं ते उगवलं तरी त्याला बाजारपेठ मिळणं व योग्य भाव मिळणं यांच संकट त्याच्यासमोर असतं. सतत तणाव सहन करीत शेतकरी मेहनत करीत असताना आणि त्याच्या कष्टाचं मोल जाणून कर्जमुक्तीची योजना शासनाने आणली आहे.

शासनाने याबाबत जे निकष लावले आहेत ते जाणून घेणे महत्वाचे आहे. यात कर्जमुक्तीची व्याप्ती अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळावा अशीच ठेवण्यात आली आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग या विभागांकडे याची अंमलबजावणी सोपविण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतर पध्दतीने अर्थात डीबीटी अंतर्गत याचा लाभ मिळणार आहे.

खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्यांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचावा यासाठी शासनाने निश्चित केलेले हे निकष अत्यंत पारदर्शक असून, ही योजना थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीशी जोडलेली असल्याने लाभाची रक्कम मध्यस्थांच्या हस्तक्षेपाशिवाय थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर कमी होऊन त्यांना बँकांकडून पुन्हा नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही राज्यातील बळीराजाच्या सन्मानाची आणि त्यांच्या शेती व्यवसायाला बळ देणारी ठरणार आहे.

केवळ शेतकऱ्यांना थकबाकी मुक्त करणे, हा या योजनेचा उद्देश नाही. शेतकऱ्याला पुन्हा आत्मविश्वासाने उभे करणे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणे, हे मुख्य ध्येय आहे. 'सबळ शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र' या मंत्राचा उच्चार करत, ही योजना राज्याच्या कृषी क्षेत्रासाठी खऱ्या अर्थाने एक मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही.

**साभार : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**




# मोबाईलमधील सोशल मीडिया सुरक्षेसाठी 'ही' सेटिंग करा बंद

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया ॲप्स हे प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले आहेत. कुणी मनोरंजनासाठी, तर कुणी ऑफिसच्या कामासाठी दिवस-रात्र सोशल मीडियाचा वापर करत असते, पण तुम्ही नकळत या ॲप्सना दिलेल्या काही परवानग्या तुमच्या खासगी आयुष्यासाठी आणि प्रायव्हसीसाठी मोठा धोका बनू शकतात. अनेकदा असे दिसून आले आहे की, सोशल मीडिया ॲप्स युजर्सचे बोलणे गुपचूप ऐकत असतात. स्मार्टफोनमधील एक छोटीशी सेटिंग बदलून तुम्ही हा धोका पूर्णपणे रोखू शकता.



### अँड्रॉइड फोनमध्ये अशी बंद करा सेटिंग

जर तुम्ही अँड्रॉइड स्मार्टफोन वापरत असाल, तर खालील सोप्या स्टेप्स फॉलो करून मायक्रोफोन एक्सेस बंद करू शकता. सर्वात आधी तुमच्या फोनच्या Settingsमध्ये जा. तिथे Privacy किंवा Security & Privacy या पर्यायावर क्लिक करा. यानंतर Permission Manager किंवा App Permissionsचा पर्याय निवडा. आता Microphone वर टॅप करा. इथे तुम्हाला अशा सर्व ॲप्सची यादी दिसेल, ज्यांना मायक्रोफोनची परवानगी मिळालेली आहे. ज्या ॲप्सना मायक्रोफोनची गरज नाही, त्यांच्या समोरील सेटिंग Don't Allow किंवा Allow Only While Using the App (ॲप वापरत असतानाच परवानगी) वर सेट करा.

### आयफोन युजर्सनी काय करावे?

आयफोनमधील Settings उघडा आणि Privacy & Securityमध्ये जा. तिथे Microphone या पर्यायावर टॅप करा. तुमच्या समोर मायक्रोफोनचा एक्सेस असलेल्या सर्व ॲप्सची यादी येईल. येथून तुम्ही ज्या ॲप्सचा कमी वापर करता किंवा ज्यांना मायक्रोफोनची गरज नाही, त्यांचा एक्सेस सहज बंद करू शकता.

मोबाईलमधील प्रत्येक ॲपला मायक्रोफोन किंवा कॅमेऱ्याचा एक्सेस देणे स्वतःहून संकट ओढवून घेण्यासारखे आहे. नेहमी फक्त अधिकृत व विश्वासू ॲप्सनाच अशा परवानग्या द्याव्यात. अनेक असे गेम्स किंवा फोटो एडिटिंग ॲप्स असतात ज्यांना मायक्रोफोनचे काहीही काम नसते, तरीही ते इन्स्टॉल होताना मायक्रोफोनची परमिशन मागतात. अशा संशयास्पद ॲप्सना परवानगी देऊ नका. यामुळे तुमची प्रायव्हसी अबाधित राहील आणि ॲप तुमचे खासगी बोलणे चोरून ऐकू शकणार नाही.

# स्वरचंद्रिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर

चतुरस्र गायिका व संगीतकार पद्मजा फेणाणी यांचा जन्म ७ जुलै १९६२ साली मुंबईतील एका कलासक्त कुटुंबात झाला. फेणाणी हे सारस्वत ब्राह्मण कुटुंब मूळ कारवारचे. वडील शंकर फेणाणी हे व्यावसायिक चित्रकार व संगीताचे विशेष प्रेमी. आई शैलजा फेणाणी या हस्तकलाकौशल्यात निपुण. थोरल्या भगिनी उषा फेणाणी या उत्तम व्यक्तिचित्रणकार. बालपणापासूनच पद्मजावर अभिजात संगीताचे संस्कार होत गेले. त्यांच्या थोरल्या भगिनी उषा फेणाणींनीच त्यांना संगीताचे प्राथमिक धडे दिले.

पद्मजा फेणाणींचे शालेय शिक्षण दादरच्या बालमोहन विद्यालयातून झाले. त्यानंतर रुपारेल महाविद्यालयामधून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर सोमय्या महाविद्यालयामधून सूक्ष्मजीवशास्त्र हा विषय घेऊन त्यांनी विज्ञानाची पदवी संपादन केली.

वयाच्या आठव्या-नवव्या वर्षी वडिलांचे मित्र सुप्रसिद्ध सतारवादक अब्दुल हलीम जाफरखाँ यांनी पद्मजाचे गाणे ऐकल्यावर तिला शास्त्रीय गायन शिकविण्याचा सल्ला दिला. वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत त्यांना गुरू लाभला नव्हता, परंतु ग्रहणशक्तीतून त्यांचे गायन विकसित होत होते. वयाच्या चौदाव्या वर्षी मुंबई दूरदर्शनच्या 'किलबिल' या कार्यक्रमातून त्या गायल्या. वयाच्या अठराव्या वर्षी १९८० साली या एकाच वर्षात वेगवेगळ्या



### निमित्त

२५ स्पर्धांत भाग घेऊन त्यांनी प्रत्येक स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले होते. सी. रामचंद्र, जयदेव आणि एस.एन. त्रिपाठी यांसारख्या मातब्बर संगीत दिग्दर्शक असलेल्या परीक्षकांकडून पद्मजा यांना १९८० साली 'सुरसिंगार'चा एस.डी. बर्मन पुरस्कार लाभला. त्यांचे खऱ्या अर्थाने शास्त्रोक्त संगीत शिक्षण १९८० सालापासून रीतसर सुरू झाले. उत्तर भारतीय रागदारी संगीतातील सुप्रसिद्ध गायक पं. जसराज यांच्या त्या गंडाबंध शागीर्द झाल्या. त्यांच्याकडे शिकत असतानाच पं. हृदयनाथ मंगेशकरांची त्यांच्याशी ओळख झाली. पुढे हृदयनाथांच्याही त्या शिष्या झाल्या. चार वर्षांच्या पं. जसराजांच्या तालमीनंतर त्या सुप्रसिद्ध सारंगीवादक पं. रामनारायण यांच्याकडेही पाच सहा वर्षे शिकल्या.

दूरदर्शनवरील 'शब्दांच्या पलीकडे' या कार्यक्रमातून त्या रसिकांपर्यंत पोहोचल्या. 'शब्दांच्या पलीकडे' या कार्यक्रमात १९८१ साली शांताराम नांदगावकरांचे 'धुंद मंद ही अशीच सांज उतरली' हे अनिल मोहिल्यांनी संगीतबद्ध केलेले गाणे त्यांनी सादर केले. दूरदर्शनवर हे त्यांचे पहिलेच सादरीकरण होते. या गाण्याने अनेकांचे लक्ष वेधून घेतले. लता मंगेशकरांनी तिच्या गाण्याबद्दल गौरवोद्गार काढले. यानंतर त्यांची सांगीतिक कारकीर्द झपाट्याने फुलत गेली. 'निवडुंग' या चित्रपटासाठी १९८४ साली 'केव्हातरी पहाटे' व 'लव लव करी पातं' ही दोन गाणी हृदयनाथांनी पद्मजाच्या आवाजात ध्वनिमुद्रित केली. त्यांना भारत सरकारचा पद्मश्री (२००१) हा पुरस्कार मिळाला. त्यांना मियां तानसेन पुरस्कार (१९८५), 'भारत निर्माण' पुरस्कार (१९८८), आदर्श नागरिक पुरस्कार (१९८५), माणिक वर्मा पुरस्कार (२०००) इत्यादी पुरस्कार प्राप्त झाले. कुसुमाग्रजांनी त्यांना 'स्वरचंद्रिका' म्हणून संबोधले आहे.

'सगुण-निर्गुण' या 'महाराष्ट्र टाइम्स'मधील सदरातून त्यांनी आपल्या सांगीतिक जीवनातील अनुभव अतिशय संवेदनक्षमतेने शब्दबद्ध केले आहेत. त्या १९८८ साली व्यवसायाने अभियंता असलेल्या सुनील जोगळेकरांबरोबर विवाहबद्ध झाल्या.

(साभार : मराठी एव्हरग्रीन साँग्स)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पाइल्सचा त्रास- प्रचंड वेदना होतात? मग 'हे' करा...

सध्याच्या बदलेल्या जीवनशैलीत, चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयींमुळे आणि तासनतास एकाच जागेवर बसून काम केल्यामुळे अनेकांना बद्धकोष्ठतेचा त्रास आणि पर्यायाने पाइल्स म्हणजेच मूळव्याधाचा त्रास जाणवू लागतो. अनेक घरगुती उपायांनी देखील यावर मात मिळवता येते.



प्रसिद्ध डॉ. उपासना यांनी पाइल्सच्या असह्य वेदनांपासून अवघ्या सात दिवसांत आराम मिळवून देणारा एक अत्यंत सोपा आणि प्रभावी दुधाचा उपाय सांगितला आहे. अनेकदा लोक पाइल्सवर वरवरचे उपाय शोधतात, पण डॉक्टरांच्या मते, या समस्येचे मूळ आपल्या पोटात आणि आतड्यांच्या अस्वच्छतेमध्ये असते. जोपर्यंत आपली आतडी पूर्णपणे स्वच्छ आणि डिटॉक्स होत नाहीत, तोपर्यंत पाइल्सच्या वेदना कमी होत नाहीत, पण हा सोपा घरगुती उपाय केल्यास सात दिवसात फरक पाहायला मिळेल.

डॉक्टर म्हणतात की पाइल्सचा त्रास असेल तर आपल्याला सगळ्यात आधी आतड्यांना डिटॉक्स करावं लागेल. शरीरातील साठलेला मळ बाहेर न पडल्यामुळे आतड्यांवर सूज येते, यामुळे पाइल्सच्या गाठी दुखू लागतात. म्हणूनच पहिल्या सात दिवसांत पोट पूर्णपणे साफ होणं गरजेचे आहे. त्यासाठी एरंडेल तेल उपाय म्हणून रामबाण ठरते. एरंडेल तेल हे नैसर्गिक रेचक म्हणून काम करते, जे आतड्यांमधील मल मऊ करून ते सहज बाहेर काढण्यास मदत करते.

यासाठी आपल्याला रात्री झोपण्यापूर्वी अर्धा कप कोमट दुधात दोन चमचे एरंडेल तेल व्यवस्थित मिसळून घ्या आणि ते प्या. हा उपाय सलग सात दिवस न चुकता करावा लागेल. रात्री झोपताना घेतलेले हे दूध आणि एरंडेल तेल रात्रीतून पचनसंस्थेवर काम करते. एरंडेल तेलामुळे आतड्यांना वंगण मिळते. त्यामुळे सकाळी उठल्यावर पोट साफ होईल. जेव्हा पोट साफ होण्यासाठी जोर करावा लागत नाही, तेव्हा पाईल्सच्या नसांवर आणि गाठींवर येणारा ताण पूर्णपणे कमी होतो. सलग सात दिवस असे केल्याने आतड्यांमधील सूज ओसरते आणि हळूहळू प्रचंड वेदना कमी होतात.

तसेच आपल्याला दिवसातून किमान तीन ते चार लिटर पाणी पिणे आवश्यक आहे. ज्यामुळे पोट व्यवस्थित साफ होते. जेवणात हिरव्या पालेभाज्या, सलाड, मोड आलेली कडधान्ये आणि फळे खा. सात दिवस तेलकट, अतिशय तिखट, मसालेदार अन्न आणि बाहेरचे जंक फूड खाणे पूर्णपणे टाळा. यामुळे पोटही साफ होईल आणि वेदनाही कमी होतील.

# रोह्यात कुंडलिका नदीचे रौद्र रूप

## वाहतूक ठप्प, वीज खंडित ❚ रोहा, अष्टमी, भुवनेश्वर, रोठ खुर्द गावात पुराचे पाणी शिरले

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट दिल्यानंतर रोहा तालुक्यात पावसाने रविवार पासुन थैमान घालण्यास सुरुवात केली.रवीवारी कुंडलिका नदीने रौद्र रूप धारण केले होते. रात्री रोहा शहरातील सखल भागात पुराचे पाणी शिरले होते. संपूर्ण आडवी बाजारपेठ, रोहा कोलाड रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर आले होते.

सगळ्यात जास्त अष्टमी शहरात पुराचे पाणी शिरले होते. अष्टमी शहराला पाण्याचा वेढा दिसुन आला. रात्रभर सामाजिक संस्था रेस्कु टिमने पाण्यात अडकलेल्या व रेल्वे ने येजा करणाऱ्या नागरीक व प्रवाशाना बाहेर काढुन सुरक्षित ठिकाणी घेवुन जात होते.अष्टमी येथील कुटुंब सुरक्षीत ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले

रोहा शहरा नजिक असलेल्या भुवनेश्वर येथील काही भागात पाणी शिरले होते आदर्श नगर, एकता नगर, नवरत्न हॉटेल ते व जुना पब्लीक स्कुलचा परीसर पाण्याखाली होता.रोठ खुर्द गावात मोठ्या प्रमाणात पाणी गावात शिरले होते, रोहा शहर, भुवनेश्वर, अष्टमी, रोठ खुर्द गावातील नागरीकांचे मोठे नुकसान झाले आहे.

रविवारी रात्रभर पाऊस पडतच होता.सोसाटयाचा वारा ही वाहत होता त्यामुळे रात्रभर विज खंडीत होते. दुसऱ्या दिवशी पाऊस तसाच राहील्याने वीज खंडीत होते. आलेल्या पावसामुळे आपत्ती ग्रस्तांना मदतीसाठी नगरपरिषद,



पोलिस, महसूल विभागाचे मदत कार्य सुरू होते.

रोहा तालुक्यातील कुंडलिकानदीला पुर आल्याने त्याचा फटका नागरी वस्तीला बसला बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचे नुकसान झाले आहे. रात्री रोहा शहरातील सखल भागात पुराचे पाणी शिरले, रोहा शहरातील बाजारपेठ, दमखाडी, रायकर पार्क, बाजार पेठ येथे पाणी शिरले होते.अष्टमी शहरात पुराचे पाणी शिरले, अष्टमीला पाणीच पाणी असे चित्र पहावयास मिळाले. रोहा शहरा नजिक असलेल्या भुवनेश्वर येथील काही भागात पाणी शिरले आहे.त्यामुळे नागरीकांचे मोठे नुकसान झाले आहे.

खबरदारीचा उपाय म्हणुन अष्टमी येथील कुटुंब सुरक्षीत ठिकाणी स्थलांतरीत करण्याचे काम आले. रात्रभर पाऊस सुरुच असुन रात्रभर विज खंडीत झाली होती.रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील अष्टमी परीसर रात्रभर पाण्याखाली होते.नगरपरिषदेकडुन नागरीकांना सुरक्षीत ठिकाणी राहाण्याचे आवाहन करण्यात आले होते.नागरिकांन नागरीकांना खाद्य पदार्थ चे पॅकेट पाठविण्याची व्यवस्था नगरपरिषदेकडुन करण्यात आले. नगराध्यक्ष वनश्री शेडगे व मुख्याधिकारी अजयकुमार एडके त्यांच्या टिमने जातीने आपत्ती निवारणात मदत कार्य सुरू ठेवले होते बोटीच्या सहाय्याने अडकलेल्या लोकांना काढण्यात येत आहे.

मुसळधार पाऊस पडल्याने कुंडलिका नदीवरील जुन्या पुलावरुन पाणी गेल्याने दुसऱ्या दिवशीही वहातुक बंद करण्यात आली होती.नवीन पुलाच्या दोन्ही बाजुला पाणी राहील्याने हा पुल वहातुकीस बंद करण्यात आले होते.हा रस्ता बंद असल्याने रोहा ते अलिबाग, पुणे मुंबई वहातुक पुर्ण पुणे ठप्प होती.

रवीवारी सकाळी रोहा नागोठणे मार्गावरील भिसे खिंड झाड व रस्त्यावर माती आल्याने हा रस्ता वहातुकीस बंद ठेवण्यात आला. परंतु हा रस्ता धोकादायक असल्याने हा रस्ता दिवसभरासाठी बंद ठेवण्याचे



तहसीलदार किशोर देशमुख यांनी जाहीर केले होते. परंतु दुसऱ्या दिवशी रस्ता पुराच्या पाण्यामुळे बंद होता.याचा फटका नागोठणे, पाली, पुणे ठाणे मुंबई कडीला प्रवाशाना बसला होता.

रवीवारी सायंकाळी उशीरा रोहा कोलाड मार्गावरील रोठखुर्द यैथै वडाचे झाड पडल्याने किमान तीन तास वहातुक ठप्प होती.दुचाकी गाड्यांसाठी तात्पुरता मार्ग काढला होता.पोलिस, महसुल, अग्निशमन दल व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने हा रस्ता रात्री साडे आठच्या सुमारास खुले करण्यात आले.हा रस्ता बंद झाल्याने रोहा कोलाड मार्गावरील प्रवाशी, व कामगार वर्गांना फटका बसला आहे.परंतु सोमवारी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने हा रस्ता बंद होते.याचा फटका धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना बसला असुन अनेक कामगार कामावर पोहचुच शकले नाही.तर काही कामगार कंपनीतील होते.

# महाडमध्ये सलग दोन दिवस पुराचे पाणी ; व्यापाऱ्यांमध्ये घबराट

**महाड : प्रतिनिधी**

गेली पाच दिवस महाड तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत असून, सावित्रीने धोक्याची पातळी ओलांडून सावित्री चे पात्र महाड शहरामध्ये शिरल्याने महाड शहरामध्ये गेले दोन दिवसापासून पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. व्यापाऱ्यांनी आपले सर्व साहित्य इतरत्र हलवण्याची सुरुवात केली आहे. तर या दरम्यान ते टेमघर येथे धबधबा मध्ये एकजन वाहून वाहुन गेल्याची घटना घडली आहे. महाड प्रशासन अलर्ट मोड वरती असून नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

एक जुलैपासून महाडमध्ये पावसाने दमदार एन्ट्री केली असून ४ तारखेला १६२ मिमी, ५ तारखेला १२१ मिमी तर ६ जुलै रोजी २६० मिलिमीटर पाऊस पडण्याची नोंद करण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसात महाडमध्ये जवळपास ४०० मिलिमीटर एवढ्या पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर गेल्या २४ तासात महाडमध्ये २६० मिलिमीटर एवढा पाऊस पडला असल्याचे महाड तहसील कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

महाबळेश्वर पट्ट्यामध्ये २४ तासात जवळपास ५०० मिलिमीटर पाऊस पडल्याने, मोठ्या प्रमाणावर हे पाणी सावित्रीच्या माध्यमातून महाड शहर व परिसरात पुरा स्वरुपात घुसले आहे. महाड तालुक्यातील सावित्री, काळ व गांधारी नद्या दुथडी भरून वहात असून सावित्रीने ६.५ मीटर ही तिची धोक्याची पातळी ओलांडून तिची पातळी ८.५ मीटर एवढी गेल्याने पुराचे पाणी महाड बाजारपेठ, छत्रपती शिवाजी मार्ग, परिवार शोरूम, सुकट गल्ली या परिसरामध्ये शिरले आहे. महाड शहरातील व बिरवाडी शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी आपापल्या दुकानातील सामान इतरत्र हरवण्याची





सुरुवात केली असून, व्यापाऱ्यांमध्ये व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रशासनाकडून वेळोवेळी सोशल मिडिया च्या माध्यमातून पुराच्या पाण्याचे अपडेट पुरवले जात आहेत. तसेच सतर्क राहण्याचा इशारा दिला जात आहे. महाडमध्ये एनडीआरएफ व इतर रेस्कूटीमना अलर्ट वरती ठेवण्यात आले आहे. पुराच्या पाण्यामुळे गेल्या दोन दिवसापासून किल्ले रायगड कडे जाणारा नातेखिंडी ते दस्तुरीनाका हा मार्ग पुराच्या पाण्याखाली असल्याने वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. तसेच काल रात्री दादली पुलावर देखील पाणी आल्याने व खाडीपट्ट्याकडे जाणार मार्ग देखील बंद करण्यात आला होता.

महाड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे टेमघर या गावांमध्ये धबधब्यावरती गेलेल्या तिघांपैकी एकाचा साहिल सलीम शेख वय १९ रा टेमघर धबधब्याच्या पाण्यात वाहून गेल्याची घटना घडली आहे. तर मौजे कांबळे तर्फे बिरवाडी या गावात पुराच्या पाण्यात पुलावर अडकलेल्या तीन मुलांना एनडीआरएफ व स्थानिकांच्या मदतीने वाचविण्यात यश आले आहे. विन्हेरे खेड मार्गावर तुळशी खिंड या ठिकाणी दरड कोसळल्याने हा मार्ग बंद झाला होता मात्र प्रशासनाने या ठिकाणची दरड हटवून हा मार्ग वाहतुकीसाठी पुरवत केला आहे.

मौजे सांदोशी येथील पुलावरून पाणी जात असल्याने सांदोशी गावचा तालुका जवळील संपर्क तुटला आहे. भोर मार्गावरील घाटातील दरड हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. वरंध आदिवासी वाडी येथील घरांवर मातीचा ओसरा आल्याने तेथील नागरिकांना जवळच्या सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. मौजे गांधारपाले येथील साहिल नगर या ठिकाणी एका घरावर छोटी दरड कोसळल्याने घराचे पूर्ण नुकसान झाले आहे.

शहरालगत असलेल्या करंजखोल या गावातील काही घरांवर डोंगरातून आलेल्या चिखलाचा थर पसरल्याने याठिकाणी पाच कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. तर पुराच्या पाण्यामुळे सांदोशी, कावळेबावळे, सह्याद्रीवाडी, कुंबेशिवथर या गावांचा संपर्क तुटला आहे.

# खोपोलीसह खालापूर तालुक्याला पावसाने झोडपले : सांगडा पूल गेला वाहून

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

खोपोली शहर व खालापूर तालुक्यात पावसाचा कहर सुरू असून गेले सहा दिवस सूर्याचे दर्शन झाले नाही सततच्या पावसामुळे अनेक मार्गांवर व लोकवस्तीत पाणी शिरल्याने जनजीवनावर परिणाम झाला आहे. कर्जत खोपोली रेल्वे मार्गावर पटेri खाली माती वऊन गेल्याने कर्जत ते खोपोली रेल्वे सेवा बंद करण्यात आली. खंडाळा घाटात दरड कोसळल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला मिसिंग लिंक बंद करण्यात आला.

पावसाची तीव्रता पाहता खोपोली व परिसरातील शाळांना सोमवारी सुट्टी देण्यात आली होती, शहरातून वाहणाऱ्या पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडण्याने प्रशासनाने नदीकाठच्या लोकांना सतर्क केले होते, हेल्प फाउंडेशन या सामाजिक संस्थेला मदतीसाठी अनेक कॉल वारंवार येत होते.

शनिवारपासूनच सततचा धुवाधार पाऊस पडत असल्याने मुंबई पुणे जुन्या महामार्गावर युनिकॉन या इमारती जवळ रस्त्यावर पाणी आले होते उपनगराध्यक्ष व अन्य लोकप्रतिनिधींनी भर पावसात उतरून दुभाजकाचा काही भाग तोडून पाण्याचा अडलेला मार्ग मोकळा केला त्यामुळे बऱ्याच प्रमाणात वाहतुकीचा मार्ग मोकळा झाला होता. सोमवारी सकाळी खंडाळा घाटातील गारमाळ



गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दरड कोसळल्याने गावाशी संपर्क तुटला मात्र प्रशासनाने याची गंभीर दखल घेत जेसीबी यंत्राने माती बाजूला काढण्याचे काम सुरू होते.

सकाळी पुन्हा सुभाष नगर नागरी वस्तीतील मागील डोंगरावरील काहीशी माती खाली येत असल्याचे ग्रामस्थांनी प्रशासनाला कळविणे. तात्काळ

**गारमाळ येथे दरड कोसळली**

मदत यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. घटनेचे गांभीर्य पाहता आमदार महेंद्र थोरवे यांनी घटनास्थळाला भेट देत सर्व रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे प्रशासनाला आदेश दिले. त्यांच्या समवेत नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, मुख्याधिकारी पंकज पाटील व बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.. आमदार थोरवे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना काही उपयुक्त याबाबत सूचना दिल्या. मुंबई पुणे महामार्गावर अनेक ठिकाणी झाडाच्या फांद्या कोलमडून पडल्याने माहिती समोर येतआहे. धुवाधार पावसामुळे मुंबई पुणे महामार्गावरील वाहतूक मंदावली होती. पावसाळ्यात शनिवार व रविवारी मोठ्या प्रमाणात मुंबई कडून पर्यटक येत असतात, मात्र प्रशासनाने प्रवेश बंदी केल्याने पर्यटकांचा हिरेमोड झाला. तुफान पावसामुळे कर्जत खोपोली रेल्वे मार्गावरील एका ठिकाणी पटरी खालील माती सरकल्याने रेल्वे सेवा सुरक्षितेच्या दृष्टीने खंडित करण्यात आली होती. याप्रमाणे मुंबई पुणे रेल्वे मार्गावरील खंडाळा घाटातही दरड कोसळल्याची माहिती मिळत आहे त्यामुळे रेल्वे सेवेवर मोठा परिणाम झाला.

अनेक ठिकाणी पाणी तुंबल्याच्या वारंवार फोन येत होते.

खोपोली शहरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात इमारतीच्या बांधकामाचे काम सुरू असून, अनेक ठिकाणी नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहावर इमारती उभारण्याचे काम सुरू असल्याने सकल भागात पाणी तुंबत असल्याचे सांगण्यात आले.

# म्हाप्रळ-आंबेत पुलाला दोन बार्जची धडक

**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांना जोडणाऱ्या सावित्री खाडीवरील महत्त्वाच्या म्हाप्रळ–आंबेत पुलाला रविवारी सकाळी सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास वाळू वाहतूक करणाऱ्या दोन बार्जची जोरदार धडक बसली. या घटनेनंतर पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने पुलावरील सर्व प्रकारची वाहतूक पुढील आदेशापर्यंत बंद केली आहे.


धडकेनंतर दोन्ही बार्ज पुलाजवळ अडकून पडल्याने पुलाच्या संरचनेला संभाव्य धोका निर्माण झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून सार्वजनिक बांधकाम

**आंबेतमार्गे वाहतूक बंद**

विभागाने संबंधित पोलीस प्रशासनाला पुलावरील वाहतूक तत्काळ बंद करण्याच्या सूचना दिल्या. सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माणगावचे उपअभियंता यांनी मंडणगड आणि गोरेगाव पोलीस ठाण्यांना अधिकृत पत्र पाठवून पुलाजवळील मार्ग तात्पुरता बंद करण्याची विनंती केली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माहितीनुसार, राज्य महामार्ग क्रमांक १०१ वरील सावित्री खाडीवरील सुमारे ३७६ मीटर लांबीचा आंबेत पूल रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांतील वाहतुकीसाठी महत्त्वाचा दुवा आहे. पुलावरील वाहतूक बंद झाल्याने दोन्ही जिल्ह्यांतील संपर्क तात्पुरता खंडित झाला असून पुलाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.


घटनेची माहिती मिळताच महसूल, पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पुलाच्या संरचनात्मक सुरक्षिततेची तपासणी सुरू असून अडकलेले बार्ज हटविण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. तपासणी पूर्ण झाल्यानंतरच पुलावरील वाहतूक पुन्हा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# मुसळधार पावसामुळे माथेरानमध्ये झाडे पडण्याच्या घटना

**माथेरान : बातमीदार**

शनिवार पासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे माथेरान शहरात झाडे पडण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत.मागील तीन दिवसांपासून माथेरान डोंगरमाथ्या –वर पावसाचा जोर कायम असल्याने



झाडे पडण्याच्या घटना घडत आहेत.काही किरकोळ घटना सोडल्यास सुदैवाने कोणतीही दुर्दैवी घटना घडली नसली तरी पण नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

जून महिन्यात दडी मारलेल्या पावसाने जुलै महिन्याच्या सुरुवातीला दमदार आगमन करीत सर्वांना सुखद धक्का दिला.मात्र मागील ३ ते ४ दिवसांपासून मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे झाडांच्या मुळालगत ची माती वाहून जात असल्याने येथील वृक्षांना त्याचा भला मोठा फटका बसत आहे.त्यात बरोबर येथे वाऱ्याचे प्रमाण अधिक वाढल्याने काही झाडांच्या फांद्या ज्या जीर्ण झाल्या आहेत अश्या फांद्या अचानक तुटून पडत आहेत.मागील दोन दिवसांत अनेक ठिकाणी अश्या झाडांच्या फांद्या तुटून पडण्याच्या घटना येथे घडल्या आहेत.

दस्तुरी नाका येथील ई–रिक्षा स्टँड जवळ देखील अशीच झाडाची फांदी तुटून पडण्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली यामध्ये दोन पर्यटक या ठिकाणी जखमी झाले होते.त्यांना तात्काळ नेरळ येथे उपचारासाठी पाठविण्यात आले होते.


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड. पिन नं. ४१० २०६

**जाहीर आवाहन**

**धोकादायक व अतिधोकादायक इमारती तसेच सर्व गृहनिर्माण संस्थांसाठी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, इमारत मालक, भोगवटादार व रहिवाशांना कळविण्यात येते की, भारतीय हवामान विभागाने (IMD) रायगड जिल्ह्यासाठी दिनांक ०५ जुलै ते ०७ जुलै या दरम्यान "रेड अलर्ट" जारी केला असून अतिमुसळधार पाऊस, जोरदार वारे व स्थानिक पातळीवर अतिवृष्टी होण्याचा इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत जुन्या तसेच संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत इमारतींना धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम २६४ अन्वये धोकादायक व अतिधोकादायक (C–१) म्हणून घोषित करण्यात आलेल्या इमारतींमधील सर्व रहिवाशांनी तात्काळ इमारत रिकामी करून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे व महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या नोटिसा व सूचनांचे काटेकोर पालन करावे. याचबरोबर, पनवेल शहरात अलीकडील काळात धोकादायक म्हणून घोषित नसलेल्या काही इमारतींमध्येही छत / स्लॅब कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे इमारतीच्या वयाची पर्वा न करता सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था, इमारत मालक व व्यवस्थापन यांनी पात्र संरचनात्मक अभियंत्याकडून दरवर्षी इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) करून घेणे तसेच अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती, मजबुतीकरण व प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करणे अत्यावश्यक आहे.

**धोकादायक इमारतीची प्रमुख लक्षणे :**

- बीम, स्लॅब, स्तंभ किंवा भिंतींना मोठे तडे जाणे.
- काँक्रीट निखळून लोखंडी सळया उघड्या दिसणे.
- स्तंभ, भिंती किंवा इमारत झुकलेली दिसणे.
- स्लॅब किंवा प्लॅस्टर मोठ्या प्रमाणात पडणे.
- इमारतीतून असामान्य आवाज येणे.
- पावसामुळे गळती होऊन संरचनात्मक नुकसान दिसून येणे.

**नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी :**

- धोकादायक इमारतीत वास्तव्य करू नये.
- इमारतीमध्ये धोक्याची लक्षणे दिसल्यास तात्काळ तज्ञ संरचनात्मक अभियंत्याचा सल्ला घ्यावा.
- महानगरपालिकेच्या संबंधित विभागास माहिती द्यावी.
- आवश्यक असल्यास तात्काळ इमारत रिकामी करून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

**महत्त्वाची सूचना**

धोकादायक इमारतींबाबत महानगरपालिकेने दिलेल्या आदेशांचे पालन न करणे, तसेच इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) न करणे किंवा अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती न करणे यामुळे कोणतीही दुर्घटना, छत/स्लॅब कोसळणे, इमारतीचा काही भाग किंवा संपूर्ण इमारत कोसळणे, जीवितहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधित इमारत मालक, विकासक, सहकारी गृहनिर्माण संस्था/सोसायटी, भोगवटादार व व्यवस्थापन पूर्णपणे जबाबदार राहील. अशा घटनांसाठी पनवेल महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**नागरिकांना कळकळीचे आवाहन**

**"आपला जीव अमूल्य आहे. कृपया इमारतींची नियमित संरचनात्मक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करा. धोकादायक इमारती तात्काळ रिकाम्या करा आणि प्रशासनाला सहकार्य करा."**

आपत्कालीन परिस्थितीत पुढील दूरध्वनी / Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.

**दूरध्वनी क्रमांक :– ०२२–२७४५८०४०/४१/४२**
**Toll Free क्रमांक :– १८००–२२७–७०१**

**सही/–**
**आयुक्त**
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.१९२/२०४/२०२६
दिनांक : ६/०७/२०२६

# कोकणात आठ नद्यांनी ओलांडली इशारा पातळी

## किनारपट्टीवरील गावांना प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत प्रचंड वाढ झाली आहे. प्राप्त झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, कोकण विभागातील एकूण २७ प्रमुख नद्यांपैकी ८ नद्या धोक्याच्या आणि इशारा पातळीच्या वर किंवा आसपास वाहत असल्याने किनारपट्टीवरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. उर्वरित १९ नद्या सध्या इशारा पातळीच्या खाली वाहत असल्या तरी पावसाचा जोर पाहता प्रशासनाने सर्व यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यात उल्हास नदीने बदलापूर येथे १६.८० मीटर पातळी गाठून इशारा पातळी (१६.५० मीटर) ओलांडली असून ती धोक्याच्या पातळीच्या (१७.५० मीटर) दिशेने वाहत आहे. तर अंबरनाथमधीलच जांभूळपाडा येथे उल्हास नदी १३.२० मीटरवर वाहत असून तिने १३.०० मीटरची इशारा पातळी ओलांडली आहे. कल्याण तालुक्यात उल्हास नदी मोहने येथे ८.८३ मीटरवर असून येथील इशारा पातळी ९.०० मीटर आहे. टिटवाळा येथील काळू नदीने १०२.०० मीटरची इशारा पातळी गाठली असून शहापूरमधील भातसा नदी ३२.४० मीटरवर (इशारा पातळी ३६.०६ मीटर) वाहत आहे.

पालघर जिल्ह्यात मात्र नद्यांची पातळी सध्या नियंत्रणात असून सूर्या नदी (मासवण) ५.५० मीटर, वैतरणा ९८.७० मीटर आणि पिंजाळ नदी ९८.८० मीटर पातळीवर वाहत आहे, ज्यांच्या इशारा पातळी अनुक्रमे ११.०० मीटर, १०१.९० मीटर आणि १०२.७५ मीटर आहेत.



रायगड जिल्ह्यातील नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. रोहा येथील कुंडलिका नदी २४.३० मीटरवर वाहत असून तिने २३.९५ मीटरची धोक्याची पातळी पार केली आहे. रोह्यातीलच अंबा नदीने ९.०० मीटरची धोक्याची पातळी ओलांडून १२.०० मीटरची चिंताजनक पातळी गाठली आहे. महाडची सावित्री नदी ७.४० मीटरवर वाहत असून तिने ६.५० मीटरची धोक्याची पातळी केव्हाच मागे टाकली आहे. पनवेल येथील पाताळगंगा नदीने २१.५२ मीटरची धोक्याची पातळी गाठली असून कर्जत येथील उल्हास नदी ४७.४० मीटर (इशारा पातळी ४८.१० मीटर) आणि पनवेलमधील गाढी नदी ४.९० मीटर (इशारा पातळी ६.०० मीटर) पातळीवर वाहत आहे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातही नद्यांच्या पातळीवर बारीक लक्ष ठेवले जात आहे. रत्नागिरीतील खेड येथील जगबुडी नदी ९.८० मीटरवर वाहत असून तिने ७.०० मीटरची धोक्याची पातळी ओलांडून पूरस्थिती निर्माण केली आहे. चिपळूणची वाशिष्टी नदी ४.१८ मीटर (इशारा पातळी ५.०० मीटर), संगमेश्वरमधील शास्त्री नदी ४.६० मीटर, सोनवी नदी ४.४० मीटर आणि बावनदी ७.२५ मीटरवर वाहत आहे. लांजा येथील काजळी नदी १४.९२ मीटर आणि मुचकुंदी नदी १.७५ मीटरवर आहे, तर राजापूरची कोदवली नदी २.७५ मीटरवर वाहत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग येथील तिलारी नदी ३८.३० मीटर, सावंतवाडीतील तेरेखोल नदी २.३० मीटर, कुडाळची कर्ली नदी ५.०० मीटर, कणकवलीतील गडनदी ३५.४० मीटर आणि वैभववाडीतील वाघोटन नदी ६.८० मीटर पातळीवर वाहत असून येथील सर्व नद्या सध्या इशारा पातळीच्या खाली आहेत.

# मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी आज साधणार उत्तराखंडीयांशी संवाद

**कळंबोली : प्रतिनिधी**



उत्तराखंडातील मोठ्या संख्येने नागरिक देशातील विविध राज्यांमध्ये तसेच परदेशात स्थायिक झाले आहेत. या प्रवासी उत्तराखंडीयांना आपल्या मातृभूमीशी जोडून ठेवण्यासाठी आणि राज्याच्या विकासात त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने उत्तराखंड शासन सातत्याने 'प्रवासी संवाद' उपक्रम राबवत आहे.याच उपक्रमा अंतर्गत दि. ६ जुलै रोजी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी नवी मुंबई येथे आयोजित 'प्रवासी संवाद' कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

उत्तराखंड शासनाच्या वतीने सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित या कार्यक्रमात विविध प्रवासी उत्तराखंडी संघटनांसह समाजातील मान्यवर प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांची भूमिका स्पष्ट आहे की, प्रवासी उत्तराखंडीयांनी आपल्या अनुभव, ज्ञान आणि योगदानाच्या माध्यमातून राज्याच्या सर्वांगीण विकासात अधिक प्रभावी सहभाग घ्यावा. याच उद्देशाने ते यापूर्वीही 'प्रवासी संवाद' कार्यक्रमांमध्ये सहभागी होत आले आहेत.

प्रवासी उत्तराखंडी समाज आपल्या प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि समर्पणासाठी देशभर ओळखला जातो. ज्या राज्यात ते वास्तव्यास आहेत, त्या राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीतही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. या योगदानाला उत्तराखंडच्या विकासाशी जोडण्यासाठी राज्य शासनाने 'प्रवासी संवाद' या उपक्रमाची प्रभावी सुरुवात केली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून देहरादून येथे 'प्रवासी संमेलन' आयोजित करण्यात येत असून, देशभरातील तसेच परदेशातील उत्तराखंडीय त्यामध्ये उत्साहाने सहभागी होत आहेत. या संवादामुळे प्रवासी समाजामध्ये आपल्या मातृभूमीच्या विकासासाठी योगदान देण्याची भावना अधिक दृढ झाली आहे.आगामी कार्यक्रमात मुख्यमंत्री प्रवासी बांधवांशी थेट संवाद साधून उत्तराखंडच्या विकासासाठी नव्या संधी, कल्पना आणि सहकार्याच्या विविध विषयांवर चर्चा करणार आहेत.सर्व प्रवासी उत्तराखंडी बांधवांनी या महत्त्वपूर्ण संवाद कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन सर्व सामाजिक व प्रवासी संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोनम डोंगरेच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी; आमदार मंदा म्हात्रे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**



ऐरोली येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या गर्भवती सोनम डोंगरे यांचा तसेच त्यांच्या गर्भातील बाळाचा उपचारादरम्यान झालेला दुर्दैवी मृत्यू अत्यंत वेदनादायी आणि गंभीर स्वरूपाचा आहे. या घटनेची निष्पक्ष, सखोल व जलदगतीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच मृत महिलेच्या कुटुंबीयांना शासन व नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तातडीने योग्य आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

या प्रकरणात वैद्यकीय निष्काळजीपणाचे आरोप करण्यात आले असून त्याची दखल घेत नवी मुंबई महानगरपालिकेने चौकशीसाठी उच्चस्तरीय समितीची नियुक्ती केली आहे तसेच संबंधित डॉक्टरांना निलंबित करण्यात आले आहे, मात्र चौकशी केवळ औपचारिक न राहता ती पारदर्शक व वेळेत पूर्ण करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही आमदार मंदा म्हात्रे यांनी केली आहे.

याचबरोबर नेरूळ येथील एल.पी. नाका पुलाखाली पावसाच्या पाण्यात विद्युत केबलचा संपर्क आल्याने दोन विद्यार्थिनींना विजेचा तीव्र धक्का बसल्याची धक्कादायक घटना नुकतीच घडली. या घटनेतील विद्यार्थिनींना आवश्यक वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासोबतच शासन व नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत योग्य आर्थिक सहाय्यही तातडीने देण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

या दोन्ही दुर्दैवी घटनांमुळे संबंधित कुटुंबांवर मोठे आर्थिक व मानसिक संकट कोसळले आहे. त्यामुळे प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत पीडितांना त्वरित न्याय, आवश्यक आर्थिक दिलासा आणि सर्वतोपरी मदत उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केली.

# रानसई धरण तुडुंब भरून ओसंडून वाहू लागले

## उरणकरांची वर्षभराची पाण्याची चिंता मिटली

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील नागरिक आणि औद्योगिक विभागाला पाणी पुरवठा करणारे रानसई धरण अखेर रविवारी रात्री उशिराने तुडुंब भरले असून मोठ्या प्रमाणात ओसांडून वाहत आहे.अवघ्या पाच दिवसाच्या जोरदार पावसाने हे धरण भरले आहे.हा आज पर्यंतचा रेकॉर्ड आहे. जून महिना कोरडा गेल्याने उरणकारांची पाणी चिंता वाढली होती. त्यामुळे नियमितपणे पाणी कपात असलेल्या मंगळवार आणि शुक्रवार खेरीज एमआयडीसीने जादाची रविवारचीही पाणी कपात लागू केली होती. रानसई धरण याची ११६ फूट उंची असलेल्या धरणात ८६ फूट ही मृतसाठ्याची पातळी आहे.

ही पातळी खालावून ती ८१ फुटांवर पोहचली होती. त्यामुळे पाणी चिंता आणखी वाढली होती. मात्र जुलै मध्ये मोसमी पावसाने जोरदार आगमन केल्याने एमआयडीसीने रविवारची पाणी कपात रद्द केली होती. पुढील काळात उरणकारांची दोन दिवसांची पाणी कपात ही रद्द होणार आहे. रानसई धरणाची पातळी खालावल्याने येथील नागरिकांना नोव्हेंबर महिन्यापासूनच वर्षोनुवर्षे पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. धरणाची पाणी क्षमता



वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेकवर्षे धूळखात बसला आहे.

उरण तालुक्यातील नागरिकांना व येथील उद्योगासाठी लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जात असून उरणकराना दररोज ४१ दश लक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे. मात्र एमआयडीसी कडे केवळ ३० दश लक्ष लिटर पाणीच असल्याने दररोज १० दशलक्ष लिटर पाणी कमी पडत असल्याने हा पाणी पुरवठा जून महिन्या पर्यंत करता यावा यासाठी पाणी कपात केली जात आहे.

रानसई धरणाची क्षमता वाढविण्याची मागणी कित्येक वर्षपासून होत आहे.रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी धरणाची उंची वाढवावी किंवा धरणातील गाळ काढावा या दोन उपाययोजनाची चर्चा गेल्या पंचवीस वर्षा पासुन केली जात आहे. यातील धरणाच्या गाळाची पाहणी पुण्यातील एका संस्थेकडून करण्यात आली असून गाळाचे प्रमाण कमी असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र साठ वर्षात धरणग्रस्तांचे पुनर्वसन नाही.रानसई धरणाच्या उभारणीसाठी ज्या शेतकरी व आदिवासीच्या जनिमी संपादीत करण्यात आलेल्या आहेत.त्यांचे पुनर्वसन आजही झालेले नाही.

# पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी सतर्क रहा

## महावितरणचे नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळ्यातील मुसळधार पाऊस, वादळी वारे, अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे वीजयंत्रणेचे नुकसान होऊन विद्युत अपघात होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे सार्वजनिक तसेच घरगुती वीजयंत्रणेबाबत नागरिकांनी अधिक सतर्कता बाळगावी, तसेच संभाव्य धोका टाळण्यासाठी काही ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्रांचा वीजपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्याची आवश्यकता भासू शकते. अशा वेळी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. संजय पाटील यांनी केले आहे.

अतिवृष्टीमुळे झाडे किंवा फांद्या पडून वीजतारा तुटणे, वीजखांब वाकणे अथवा कोसळणे, रोहित्र, फिडर पिलर किंवा इतर वीजयंत्रणांच्या परिसरात पाणी साचणे, तसेच ओलाव्यामुळे विद्युत उपकरणांमध्ये बिघाड होऊन अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे तुटलेल्या किंवा लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सुरक्षित अंतर राखावे. अशा तारांना स्पर्श करू नये किंवा त्या स्वतः हटविण्याचा प्रयत्न करू नये.

घरातील विद्युत सुरक्षिततेकडेही विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. पाणी हे विजेचे उत्कृष्ट वाहक असल्याने ओलसर स्विचबोर्ड, प्लग किंवा विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. घरातील अर्थिंगची वेळोवेळी तपासणी करून घ्यावी. विजेवर चालणारी उपकरणे वापरल्यानंतर ती स्विचबोर्डवरून बंद करावीत. इन्सुलेशन निघालेल्या अथवा उघड्या वायर तात्काळ बदलून घ्याव्यात.

ग्रामीण भागात वीजखांब किंवा स्टे वायरला जनावरे बांधू नयेत. वीजतारांच्या जवळ कपडे वाळत घालणे टाळावे. तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेल्या रोहित्र, फिडर पिलर, वाहिनी पिलर, रोहित्र पेट्या किंवा इतर वीजयंत्रणेजवळ अनावश्यक वावर करू नये. वीजपुरवठा खंडित झाल्यास घाईगडबड न करता काही वेळ प्रतीक्षा करून महावितरणच्या ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधावा.

वीजखांब पडणे, वीजतारा तुटणे, रोहित्र जळणे किंवा इतर कोणताही विद्युत बिघाड आढळल्यास महावितरणचे १९१२, १९१२०, १८००-२३३-३४३५ आणि १८००-२१२-३४३५ हे टोल-फ्री क्रमांक २४ तास उपलब्ध आहेत. तसेच संबंधित स्थानिक नियंत्रण कक्षाशीही संपर्क साधता येईल. वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार नोंदविण्यासाठी नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून ०२२-५०८९७१०० या क्रमांकावर मिस्ड कॉल देण्याची सुविधाही उपलब्ध आहे, असे महावितरणच्या भांडूप परिमंडलाने नागरिकांना आवाहन केले आहे.

# येत्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि. १३ जुलै,२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. असे कोंकण विभागाच्या अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम यांनी कळविले आहे.

# एमएनएम विद्यालयात पालक अभिमुखता कार्यक्रम

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथे पालकांसाठी पालक अभिमुखता (Orientation Programme) तसेच पालक-शिक्षक संघ (PTA) नामनिर्देशन प्रक्रिया उत्साहात संपन्न झाली.

दि. ४ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये नर्सरी ते इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळेचा अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, शालेय नियम, विविध शैक्षणिक उपक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच पालक-शिक्षक संघ (PTA) नामनिर्देशन प्रक्रियेबाबतही पालकांना मार्गदर्शन करण्यात आले.शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक व वैयक्तिक विकासाला चालना देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे विद्यालयाच्या प्राचार्या सौ. सायली वडवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्कृष्ट नियोजन करून अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वी आयोजन केले. कार्यक्रमादरम्यान



पालकांच्या शंकांचे समाधान करण्यात आले तसेच शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. उपस्थित पालकांनी विद्यालयाच्या कार्यपद्धतीचे व उपक्रमांचे मनापासून कौतुक केले.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि शाळा यांच्यातील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हा अभिमुखता कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केली.



# फुंडे विद्यालयात वीर वाजेकर जयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत महालनविभागाचे थोर शिक्षण महर्षी तुकाराम हरी वाजेकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

उरण तालुक्यातील महालन विभागात शिक्षण प्रसारचे महान कार्य करणारे, फुंडे पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनामाध्यमिक शिक्षण मिळावे म्हणून फुंडे विद्यालयाची स्थापना करणारे महालण विभागाचे भाग्यविधाते, उरणचे राजेवीर वाजेकर शेठ यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपमुख्याद्यापिका एस. डी. थोरात, लेखणीक नवनीत ठाकूरतसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते वीर वाजेकर शेठ यांच्या प्रतिमेचे पूजनकरून अभिवादन करण्यात आले.

# 'पाताळगंगे'च्या पुरातून २० जणांची सुखरूप सुटका; वाहतूक पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला

**पनवेल : वार्ताहर**

शनिवार पासून पडणार्या मुसळधार पावसामुळे पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. खारपाडाआपटा तसेच आपटा फाटारसायनी मार्गावर मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी आल्याने वाहतूक पूर्णपणे बंद झाली होती. पुराच्या पाण्यात मिनी बस, लक्झरी बस व इको अशा तीन गाड्या अडकल्या होत्या.

रोहा येथून रसायनीकडे जाणाऱ्या मिनी बसमध्ये चालकासह १६ प्रौढ स्त्री-पुरुष व ३ लहान मुले असे एकूण २० जण अडकले होते. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश संकपाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शशिकांत पवार तसेच नवीन पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार संजय गावडे, जितू कदम, आदिनाथ आघाव, राकेश बर्डे, दत्ता उबाळे, जयेश पाटील व बाबा काचकुंडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

पोलीस अंमलदार जयेश पाटील व राकेश बर्डे यांनी ग्रामस्थ सूर्यकांत घरत यांच्या मदतीने पुराच्या पाण्यात अडकलेल्या मिनी बसपर्यंत पोहोचून सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढत सुरक्षितस्थळी हलविले. त्यानंतर एनडीआरएफ पेन व रिलायन्स रेस्क्यू टीमच्या मदतीने अडकलेली बस बाजूला काढण्यात आली तसेच बोटीच्या सहाय्याने परिसरात शोधमोहीम राबविण्यात आली.

पोलीस उपायुक्त डॉ. राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी दोन्ही बाजूंनी रस्ता बंद करून प्रवासी व वाहनांना पर्यायी मार्गाने रवाना केले. सलग दोन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसात नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी गोवा रोड, जुना पुणे रोड आणि रसायनी रोडवर अहोरात्र मेहनत घेत वाहतूक कोंडी होणार नाही याची विशेष खबरदारी घेतली.

# दोन पीडित मुलींची वेश्याव्यवसायातून सुटका

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाविरोधात मोठी कारवाई करत एका अल्पवयीन मुलीसह दोन पीडित मुलींची सुटका केली. या प्रकरणी एका महिलेला अटक करण्यात आली असून तिच्याविरोधात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार नवी मुंबई परिसरात गौतम नावाचा इसम १६ ते १७ वर्षांच्या मुलींसह महिलांना ग्राहकांकडे वेश्याव्यवसायासाठी पाठवत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून सापळा रचला. संपर्क साधल्यानंतर आरोपीने मुलींना प्लॉट क्रमांक २, सेक्टर १९ ए, वाशी येथे आणले.

त्यावेळी पोलिसांच्या पथकाने छापा टाकून रेखा रंजन मजूमदार (वय ३८) हिला ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात तिने पश्चिम बंगालमधील एका अल्पवयीन व दोन पीडित मुलींना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वेश्याव्यवसायात ढकलल्याचे निष्पन्न झाले. तसेच पीडित मुलींचे फोटो ग्राहकांना पाठवून त्यांच्याकडून सहा हजार रुपये स्वीकारल्याचेही तपासात समोर आले. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध एनपीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# संजीव नाईक यांच्याकडून सोनम डोंगरे कुटुंबीयांचे सांत्वन

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली येथील पालिका रुग्णालयामध्ये चुकीचे इंजेक्शन दिल्याने सोनम डोंगरे या गर्भवती महिलेचा आणि तिच्या बाळाचा मृत्यू झाल्याची घटना अलीकडेच घडली होती. माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक यांनी सोनम डोंगरे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

या प्रकरणात ज्यांनी कोणी निष्काळजीपणा केला त्या दोषींवर कडक कारवाई होईल, असे स्पष्ट करून महापालिका आणि आम्ही डोंगरे कुटुंबीयांसोबत असून त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन देखील त्यांनी दिले. वनमंत्री गणेश नाईक यांच्या निर्देशानुसार महापौर आणि नगरसेवक डोंगरे कुटुंबीयांना न्याय देतील तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना होऊ नये म्हणून महापालिका खबरदारी घेईल, असेही ते म्हणाले.

# सुधागडातील अमनोरी येथे मध्यरात्री पूर

## प्रशासनाकडून ग्रामस्थांची सुखरूप सुटका



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील अमनोरी गावात मध्यरात्री दोन वाजता आलेल्या पुरामुळे शेतमजूर संदीप, त्याची पत्नी रीमा, सहा महिन्यांचा बालक अथर्व तसेच दोन जेष्ठ नागरिक असे पाच जण शेतघराच्या छतावर अडकले होते. सकाळी नऊ वाजता तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी अथक प्रयत्न करून सर्वांना सुरक्षित बाहेर काढले.

या मोहिमेत आपदा मित्र अमित निंबाळकर, नंदकिशोर शिंदे तसेच ट्रेकर दर्शन तळेकर यांनी धाडसी योगदान दिले. दरम्यान, कानसळ येथे अंबा नदीच्या पुरात अडकलेल्या १२ कामगारांदेखील आपत्ती व्यवस्थापन पथक व स्थानिक कार्यकर्ते शशी धानिवले यांच्या सहाय्याने सुखरूप बाहेर काढण्यात आले.

या दोन घटनांमध्ये एकूण १४ नागरिकांचे प्राण वाचविण्यात आले. तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या तत्परतेमुळे, आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या कार्यक्षमतेमुळे आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे मोठी दुर्घटना टळली. अमनोरी ग्रामस्थांमध्ये चंद्रकांत जयराम दिने, प्रकाश काशिराम दिने, नथुराम देऊ अमृस्कर व गणेश तुकाराम दिने यांनी बचावकार्यात सक्रिय सहभाग घेतला.

नागरिकांनी प्रशासनाच्या तातडीच्या हस्तक्षेपाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली असून या कार्यवाहीचे सर्वत्र कौतुक होत आहे.


## आयटीआयच्या प्रशिक्षणार्थ्यांची नामांकित कंपनीत झाली निवड

**माणगाव : बातमीदार**

निजामपूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये (आयटीआय) नुकतेच विविध कंपन्यांद्वारे कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. निजामपूरसह तळा आयटीआयमधील प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घेतला. यापैकी एकूण ७८ प्रशिक्षणार्थ्यांची अप्रेंटीशीपसाठी अंतिम निवड झाली असून त्यांना रोजगाराची सुवर्णसंधी मिळाली आहे.

यावेळी प्रसिद्ध गोदरेज, एल अँड टी, महिंद्रा अँड महिंद्रा, जीए स्टील टेक्नॉलॉजी खोपोली-खालापूर, प्रामा हिकविजन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड वसई या कंपन्यांनी प्रशिक्षणार्थ्यांची मुलाखत घेतली. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये आयटीआयच्या विविध ट्रेड्सच्या (फिटर, इलेक्ट्रिशन, वेल्डर, कोपा, आरएससी, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इत्यादी) प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता. कंपनीच्या प्रतिनिधींनी लेखी परीक्षा आणि तोंडी मुलाखत अशा दोन टप्प्यांत प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून आकर्षक पगार आणि इतर सवलती दिल्या जाणार आहेत.

प्रशिक्षणार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य डी.जी. ठाकूर आणि एन.एस. पुरकर यांनी आनंद व्यक्त केला, तर सर्व शिक्षक, प्लेसमेंट ऑफिसर आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




**खोपोली : रोटरी क्लब ऑफ खोपोलीतर्फे डॉक्टर डे आणि सीए डे नुकताच भानवज येथील रोटरी हॉलमध्ये साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. सुनील डोंगरे, डॉ. एम.आर. पाटील, डॉ. संगीता केजरीवाल, डॉ. जयवंत केजरीवाल, डॉ. नलिन शहा तसेच सीए दिलीप ओसवाल, अजित जोशी, निखिल जैन, बरखा जैन, कौस्तुभ जोशी, विवेक जैन, डोंगरे यांचा नवनिर्वाचित अध्यक्ष कविता खोपकर, सेक्रेटरी रोहित भल्ला, उपाध्यक्ष संजय बोंडार्डे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला रोटरी क्लबचे इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.**

## पोलिसांच्या मध्यस्थीने नियोजित उपोषण रद्द

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडजवळील राजपुरी कोळीवाडा परिसरातील जगदीश आंबटकर यांनी समाजाने बहिष्कृत केले म्हणून ६ जुलैपासून मुरुड पोलीस ठाण्यासमोर उपोषण करणार होते. याबाबत त्यांनी रायगड जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक, मुरूड पोलीस व तहसीलदार यांना निवेदन दिले होते. याची मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे यांनी गंभीर दखल घेत राजपुरी पंच मंडळीस पोलीस ठाण्यात बोलावून आंबटकर यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

यावेळी राजपुरी पंच मंडळी यांनीसुद्धा समजूतदार भूमिका घेत समझोता करून आंबटकर यांनी मागणी केल्याचे पत्र देण्यात आले तसेच त्यांना मुंबई फंड सभासद करून घेण्यास राजपुरी कोळीवाडा पंच मंडळींचा कोणताही आक्षेप नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे आंबटकर यांनी नियोजित उपोषण रद्द केले असून पोलिसांचे आभार मानले आहेत.

## विनय वेखंडे शेतीनिष्ठ पुरस्काराने सन्मानित



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील प्रगतशील शेतकरी म्हणून विविध प्रकारची शेती करणारे विनय वेखंडे यांना राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या वतीने शेतीनिष्ठ शेतकरी म्हणून सन्मानित करण्यात आले. राज्यातील शेतीनिष्ठ शेतकरी आणि कृषीभूषण शेतकऱ्यांना राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी गौरविले. यात वेखंडे यांचा समावेश होता.

विनय मारुती वेखंडे हे गेली ४० वर्षे वेगवेगळ्या प्रकारची शेती करीत असतात. त्यांना कृषी विभागाचा शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर झाला होता आणि कृषी दिनी राज्यपाल विष्णू देव वर्मा यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी वेखंडे यांच्या पत्नी आणि शेतीमध्ये सक्रिय राहून मशागत करणाऱ्या छाया वेखंडे यादेखील सोबत होत्या.

मुंबई येथील वरळी डोम येथे आयोजित कार्यक्रमाला राज्याचे कृषीमंत्री दत्ता भरणे, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## खोपोली शिळफाटा येथील डाकघर पुन्हा होणार सुरू

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूरचे मुख्य कार्यालय असलेल्या खोपोली शिळफाटा येथील पोस्ट इमारतीच्या छपरावरील सिमेंट पत्रे फुटल्याने पावसाचे पाणी पडून कार्यालय डबके बनले होते तसेच चिखल व दुर्गंधीने १७ कर्मचारी व अधिकारी नाकला रुमाल लावून काम करीत होते. अखेर याची दखल घेत पोस्टाचे विभागीय अधिकारी तोपारे यांनी तात्पुरती स्वरूपात भाड्याने दोन रूम घेतले असून येत्या दोन महिन्यांत पूर्वीच्या ठिकाणी संगम रिसॉर्ट, आनंद शाळा येथील तीन हजार स्क्वेअर फूटाचे कार्यालय अद्ययावत व कायमस्वरुपी सुरू करण्यात येणार आहे, असे सांगितले.




मागील एक वर्ष शिळफाटा पोस्ट ऑफिस बंद असल्याने रहिवाशांना व वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांना पोस्टाची कामे करून घेण्यासाठी १०० रुपये पदरमोड करून खर्च करून खोपोली गावात जावे लागत असे. वेळ व पैशांचा अपव्यय होत असल्याने सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक संजय पाटील यांनी नवी मुंबई डिव्हिजन अधिकारी श्री. तोपारे यांची भेट घेऊन चर्चा केली व लेखी निवेदन दिले. पोस्ट ऑफिस सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचाही इशारा दिला.

यावेळी निवेदन सादर करताना पाटील यांच्यासह शिळफाटा ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष अमोल शहाणे, आरपीआयचे जिल्हा युवक अध्यक्ष प्रमोद महाडिक, ग्रामस्थ मंडळ उपाध्यक्ष मोहन केदार, उद्योजक सुनील शिंदे, विलास चव्हाण व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, मागील पावसाळयात २०२५मध्ये शिळफाटा पोस्ट ऑफिसमध्ये छताला गळती लागल्याने कार्यालयाला डबक्याचे स्वरूप प्राप्त होऊन पाणीच पाणी झाले आहे. पावसाच्या पाण्यामुळे कागदपत्रे, ट्रेझरीचे कपाट भिजले होते, तर काही कागदपत्रे कर्मचाऱ्यांनी काळजी घेत वेळीच बाजूला केली होती. वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याने कार्यालय अंधारमय झाले होते. संगणक बंद होत. वीजपुरवठा खंडित झाल्याने मोबाइलच्या टॉर्चवर कर्मचारी काम करीत होते. यामुळे नागरिकांसह कर्मचाऱ्यांची गैरसोय होत होती. जवळचे डाक घर पुन्हा सुरू होणार असल्याने शिळफाटा व आसपासच्या गावातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

## गारमाळ धनगरवाडा रस्त्याचे काम पूर्ण



**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याच्या चावणी ग्रामपंचायत हद्दीतील गारमाळ धनगरवाडा येथील ग्रामस्थ रस्ता पंधरा दिवसांत तयार करून देतो असे लेखी आश्वासन ग्रामपंचायतीकडून देण्यात आले. त्यानंतर ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण तुर्त मागे घेतले होते. दिलेले आश्वासन ग्रामपंचायतीने पाळत रस्ता तयार करून दिला. त्यामुळे ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

गारमाळ येथे गेल्या अनेक वर्षांपासून धनगरवाडा असून येथे जाण्यासाठी अजूनही रस्ता नव्हता. येथील ग्रामस्थांसह लहान मुलांना पावसात चिखल तुडवत जीवघेणा पायी प्रवास करावा लागत होता. त्यामुळे त्यांच्या उपोषणनाची तत्काळ दखल चावणी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच यांनी घेऊन हिरानंदानी कंपनीच्या व्यवस्थापनाशी जागेसंदर्भात यशस्वी चर्चा करून जागेचा प्रश्न मार्गी लावला. याचबरोबर रस्त्याला खडी-कपची, ग्रीट टाकून तात्पुरता रस्ता तयार करण्यात आला आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांच्या घरापर्यंत गाड्या जात असून त्यांना आता कोणत्याही समस्यांचा सामना करावा लागणार नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहेत.

## माणगाव पंचायत समिती कार्यालयात शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै रोजी माणगाव पंचायत समिती येथे कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सभापती विलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रातील विविध योजनांची माहिती देऊन आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांनी केले. यानंतर कृषी विस्तार तज्ज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर यांनी कृषी केंद्र रोहा येथे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. उद्यानविद्या तज्ज्ञ डॉ. राजेश मांजरेकर यांनी शेतीपूरक व्यवसाय, जोडधंदे, दुग्धव्यवसाय व फळबाग लागवड याविषयी मार्गदर्शन केले.

प्रगतशील शेतकरी रोहिदास हर्णेकर व संजीव घरसाडे यांनी युवकांनी शेतीकडे वळावे, शेती व्यवसायात योग्य नियोजन केल्यास चांगला नफा मिळू शकतो, असे सांगत शेतीच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

गटविकास अधिकारी शुभदा पाटील तसेच उपसभापती मनीषा मालोरे यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. सभापती विलास शिंदे यांनी कृषी दिनाच्या शुभेच्छा देताना, मी स्वतः शेतकरी असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत असून पंचायत समितीच्या माध्यमातून अधिकाधिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहीन, असे सांगितले.

यावेळी प्रगतशील शेतकरी तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य संगीता बक्कम, अक्षय जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी मानसी रहाटे, तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर, डॉ. प्रमोद मांडवकर, डॉ. राजेश मांजरेकर, कृषी अधिकारी सचिन काळे, सहाय्यक प्रशासन अधिकारी स्नेहल मोरे, विस्तार अधिकारी अशोक मारकंड, विस्तार अधिकारी प्रकाश सरतापे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



## वडिलांच्या विचारांचा समृद्ध वारसा जपणारे ॲड. राजीव साबळे

काही व्यक्ती आपल्याच आयुष्यापुरत्या जगत नाहीत; त्या आपल्या कार्यातून अनेक पिढ्यांच्या आयुष्यात प्रकाश पेरत राहतात. त्यांच्या विचारांचा सुगंध, त्यांच्या कर्तृत्वाची उब आणि त्यांच्या माणुसकीचा स्पर्श काळाच्या पलीकडे जाऊन समाजाला प्रेरणा देत राहतो. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे ॲड. राजीव साबळे.



स्व. अशोकदादा साबळे यांनी दिलेला "असेन मी... नसेन मी... कर्तृत्वातून दिसेन मी" हा जीवनमंत्र ॲड. राजीव साबळे. यांनी केवळ जपला नाही, तर आपल्या प्रत्येक कृतीतून साकार करून दाखविला आहे. वडिलांच्या विचारांचा समृद्ध वारसा, समाजाप्रती असलेली निष्ठा आणि शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडविण्याचा ध्यास याने त्यांचे संपूर्ण जीवन अर्थपूर्ण बनवले आहे.

माणगाव आणि परिसरातील असंख्य विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्नांना आकार देण्यासाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्था आज ज्ञान, संस्कार आणि गुणवत्तेची दीपस्तंभ बनल्या आहेत. त्या फक्त शिक्षण देत नाहीत, तर आत्मविश्वास, स्वाभिमान आणि उज्ज्वल भविष्य घडवतात. हजारो विद्यार्थ्यांच्या यशामागे ॲड. साबळे यांच्या दूरदृष्टीचे आणि अथक परिश्रमांचे मोलाचे योगदान आहे.

साहेबांना वृक्षांचे प्रेम आहे, कारण प्रत्येक रोपट्यात त्यांना भविष्यातील हिरवाई, पर्यावरणाचा श्वास आणि पुढील पिढ्यांचे सुरक्षित जीवन दिसते. त्यांना क्रिडेची आवड आहे, कारण खेळातून घडणारी शिस्त, जिद्द, नेतृत्व आणि संघभावना हीच यशाची खरी शिदोरी आहे यावर त्यांचा विश्वास आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना माणसे प्रिय आहेत, कारण दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटणारे हास्य हेच त्यांच्या कार्याचे सर्वात मोठे यश आहे. त्यांचे जीवन एक अमूल्य संदेश देऊन जाते ते म्हणजे, झाडे लावणारा माणूस सावली देतो.. शिक्षण देणारा माणूस भविष्य घडवतो... आणि माणुसकी जपणारा माणूस इतिहास घडवतो...

साहेब, आपल्या कार्याचा सुवास समाजात असाच दरवळत राहो. आपल्या विचारांची ज्योत अनेक पिढ्यांच्या मनात प्रज्वलित राहो. आपण घडविलेल्या विद्यार्थ्यांच्या यशातून, समाजासाठी केलेल्या सेवेतून आणि आपल्या माणुसकीतून स्व. अशोकदादा साबळे यांचा जीवनमंत्र सतत उजळत राहो. ईश्वरचरणी मनःपूर्वक प्रार्थना की, आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड उत्साह आणि समाजसेवेची निरंतर ऊर्जा लाभो. आपल्या हातून अशीच जनहिताची, शिक्षणाची आणि समाजउन्नतीची असंख्य कार्ये घडत राहोत. आपल्याला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा..!

**-मेहरोश दानिश सनगे,**
**प्राचार्य,**
श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग, माणगाव-रायगड.

# इंग्लंड उपांत्यपूर्व फेरीत
## मेक्सिकोवर शानदार मात

**मेक्सिको सिटी : वृत्तसंस्था**

१० खेळाडूंसह खेळणाऱ्या इंग्लंड संघाने मेक्सिकोचा ३-२ असा पराभव करून विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. या विजयामुळे मेक्सिकोचा या स्पर्धेतील अपराजित राहण्याचा सिलसिलाही खंडित झाला आहे.

सामन्याच्या ३६व्या आणि ३८व्या मिनिटाला ज्युड बेलिंगहॅमने अवघ्या ९८ सेकंदांच्या अंतराने दोन गोल करत इंग्लंडला २-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. मेक्सिकोसाठी जुलियान क्विनोनेसने ४२व्या मिनिटाला एक गोल परत केला, ज्यामुळे उत्तरार्धात सामन्याची रंगत वाढली.

५४व्या मिनिटाला इंग्लंडचा खेळाडू जारेल क्वानसाह याला रेड कार्ड मिळाल्याने इंग्लंडला १० खेळाडूंसह खेळावे लागले. मेक्सिकोसाठी ही मोठी संधी होती, मात्र इंग्लंडच्या हॅरी केनने मिळालेल्या पेनल्टीचे रूपांतर गोलमध्ये करून इंग्लंडला ३-१ने आघाडीवर नेले. विश्वचषक कारकिर्दीतील हा केनचा १४वा गोल ठरला असून या स्पर्धेतील त्याचे एकूण सहा गोल झाले आहेत. आता तो 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत लिओनेल मेस्सी, कायलियन एमबाप्पे आणि अर्लिंग हालंड यांच्याशी कडवी स्पर्धा करत आहे.



सामन्याच्या उत्तरार्धात राऊल हिमेनेझने पेनल्टीद्वारे गोल करून स्कोअर ३-२ असा केला. शेवटच्या २१ मिनिटांत आणि अतिरिक्त ११ मिनिटांच्या खेळात मेक्सिकोने इंग्लंडच्या गोलपोस्टवर तुफानी हल्ले चढवले, मात्र गोलकीपर जॉर्डन पिकफोर्ड आणि इंग्लंडच्या बचावपटूंनी अत्यंत संयमाने मेक्सिकोचे सर्व हल्ले परतवून लावले.

मेक्सिकोच्या चाहत्यांसाठी हा निकाल अत्यंत निराशाजनक ठरला आहे. १९८६नंतर मेक्सिकोला उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवता आलेले नाही आणि यंदाही त्यांचे स्वप्न थोडक्यात हुकले आहे.

### आता नॉर्वेविरुद्ध 'हाय-व्होल्टेज' सामना

या विजयामुळे इंग्लंडचा संघ आता उपांत्यपूर्व फेरीत पोहचला असून तिथे त्यांचा मुकाबला अर्लिंग हालंडच्या नॉर्वेविरुद्ध होणार आहे. हा सामना शनिवारी फ्लोरिडातील मियामी गार्डन्स येथे रंगणार आहे. १० खेळाडू असूनही दाखवलेली जिद्द आणि विजय यामुळे इंग्लंडचे प्रशिक्षक आणि चाहते मोठ्या उत्साहात आहेत.

# ऑस्ट्रेलियाचे विक्रमी सातव्यांदा विश्वविजेतेपद
## महिला टी-२० वर्ल्डकप फायनलमध्ये इंग्लंड पराभूत

**लंडन : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघाने पुन्हा एकदा जागतिक क्रिकेटमध्ये आपला दबदबा सिद्ध करत टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले आहे. अंतिम सामन्यात इंग्लंडचा सात विकेट्सने पराभव करत ऑस्ट्रेलियाने विक्रमी सातव्यांदा महिला टी-२० विश्वचषक जिंकण्याची कामगिरी केली.




इंग्लंडने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ४ बाद १५० धावा केल्या. कर्णधार नॅट स्कीवर-ब्रंट हिने ५३ चेंडूत ५८ धावांची खेळी केली. फ्रेया कॅम्पने २८ चेंडूत ४४ धावा करत संघाला चांगली साथ दिली, तर एलिस कॅपसीने २३ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून किम गार्थ, लुसी हॅमिल्टन, सोफी मोलिनिक्स आणि एनाबेल सदरलँड यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

१५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. बेथ मुनीने ४९ चेंडूत ६४ धावांची दमदार खेळी केली, तर फोबे लिचफिल्डने ३५ चेंडूत ४८ धावा करून विजयाचा पाया रचला. एलिस पेरी १३ धावांवर नाबाद राहिली. ऑस्ट्रेलियाने केवळ १७.१ षटकांत तीन विकेट्स गमावत लक्ष्य गाठले. इंग्लंडकडून चार्लोट डीन, लॉरेन बेल आणि सोफी एक्लिस्टोन यांनी प्रत्येकी एक विकेट मिळवली. या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने एकही सामना गमावला नाही आणि अंतिम फेरीतही बाजी मारली.

# स्टार फुटबॉलपटू नेमारची निवृत्ती



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत रविवारी रात्री ब्राझीलचे आव्हान अत्यंत नाट्यमय आणि दुर्दैवीरीत्या संपुष्टात आले. या पराभवासोबतच ब्राझीलच्या फुटबॉल इतिहासातील एका सुवर्णकाळाचाही अंत झाला आहे. मेटलाईफ स्टेडियमवर झालेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात नॉर्वेने ब्राझीलचा २-१ असा पराभव केला. या पराभवानंतर भावूक झालेल्या नेमारने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून आपल्या निवृत्तीची घोषणा केली.

सहाव्यांदा विश्वचषक उंचावण्याचे स्वप्न घेऊन मैदानात उतरलेल्या ब्राझीलला नॉर्वेने स्पर्धेतील सर्वात मोठा धक्का दिला. ब्राझीलचा नॉर्वेने २-१ने पराभव केला. नॉर्वेच्या एर्लिंग हालांडने उत्तरार्धात लागोपाठ दोन गोल करत सामना नॉर्वेच्या बाजूने झुकवला. सामन्याच्या अगदी शेवटच्या मिनिटांत नेमारने पेनल्टीवर गोल करून ब्राझीलचे खाते उघडले, परंतु तोपर्यंत ब्राझीलचा पराभव निश्चित झाला होता.


सामन्याची अंतिम शिटी वाजताच नेमार मैदानातच डोक्याला हात लावून रडू लागला, तेव्हा सहकाऱ्यांनी त्याचे सांत्वन केले. हे अश्रू केवळ सामन्यातील पराभवाचे नव्हते, तर आंतरराष्ट्रीय फुटबॉलला निरोप देण्याचे दुःख त्यात होते.

२०१०मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण करणाऱ्या नेमारने आपल्या १६ वर्षांच्या कारकिर्दीत चार फिफा विश्वचषक आणि दोन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये ब्राझीलचे प्रतिनिधित्व केले.

> **माझी आंतरराष्ट्रीय कारकीर्द याच मेटलाईफ स्टेडियमवरून सुरू झाली होती आणि आज याच मैदानावर ती संपली आहे. आता हा प्रवास इथेच थांबत आहे.**
> **-नेमार**

# सेरेना विल्यम्सची दुहेरीतून माघार

**लंडन : वृत्तसंस्था**



अमेरिकन टेनिसपटू सेरेना विल्यम्सने गुडघ्याच्या दुखापतीमुळे विम्बल्डन २०२६मधील महिला दुहेरी स्पर्धेतून माघार घेतली आहे. सेरेनाने सोशल मीडियावर ही घोषणा केली आणि सांगितले की तिचा गुडघा अद्याप पूर्णपणे बरा झालेला नाही.

सेरेनाने तिच्या पोस्टमध्ये लिहिले की, दुहेरीतून माघार घेणे माझ्यासाठी खूप दुःखद आहे. कोर्टवर परतणे ही स्वतःच एक भेट होती आणि व्हीनससोबत पुन्हा खेळण्याची संधी खूप खास होती. मी माझा सर्वोत्तम प्रयत्न केला, पण दुर्दैवाने माझा गुडघा अजून स्पर्धेसाठी तयार नाही.

सेरेनाला या आठवड्यात तिच्या पहिल्या फेरीतील एकेरीच्या सामन्यादरम्यान ही दुखापत झाली आणि पराभव पत्करावा लागला होता.

# नॉर्वेकडून ब्राझीलचा धक्कादायक पराभव

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

न्यू जर्सी स्टेडियमवर रंगलेल्या राउंड ऑफ १६मधील लढतीत चौथ्यांदा वर्ल्डकप खेळणाऱ्या नॉर्वेच्या संघाने पाच वेळच्या विश्वविजेत्या ब्राझीलला २-१ असे पराभूत करत स्पर्धेबाहेर काढले. अर्लिंग हालँडच्या दोन गोलशिवाय गोलरक्षक ओर्जन नायलंड अभेद्य भिंत बनून उभा राहिला अन् नॉर्वेने पहिल्यांदाच वर्ल्ड कपच्या क्वार्टर फायनलमध्ये धडक मारली. दुसरीकडे १९९०नंतर पहिल्यांदाच ब्राझीलचा प्रवास क्वार्टर फायनल आधीच संपुष्टात आली.



ब्राझीलला सामन्याच्या सुरुवातीलाच आघाडी घेण्याची सुवर्णसंधी मिळाली होती, मात्र ती वाया गेली. सामन्याच्या १४व्या मिनिटाला नॉर्वेचा बचावपटू क्रिस्टोफर आयेर याने मॅथ्यूस कुन्हाला धक्का मारला. ब्राझीलला पेनल्टी मिळाली. व्हिनिसियस ज्युनिअरने स्वतः पेनल्टी न घेता ब्रुनो गिमारेसला संधी दिली, मात्र गिमारेसचा फटका नॉर्वेचा गोलरक्षक ऑर्जन नायलंड याने अचूक बचाव करत परतवून लावला आणि ब्राझीलची आघाडीची मोठी संधी हुकली.

सामन्याच्या ७९ व्या मिनिटाला अर्लिंग हालँड याने सुपर हेडरसह सामन्यातील पहिला गोल डागत संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ९०व्या मिनिटाला त्यानेच दुसरा गोल डागला अन् आघाडी भक्कम केली. ६७व्या मिनिटाला बदली खेळाडूच्या रूपात आलेल्या नेमारने इंज्युरी टाइममध्ये मिळालेल्या पेनल्टीचे गोलमध्ये रुपांतरित करत संघासाठी एक गोल डागला, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. अखेर नॉर्वेने २-१ अशा फरकाने पराभूत करत क्वार्टर फायनलमध्ये धडक मारली. पुढच्या फेरीत त्यांचा सामना इंग्लंड आणि मॅक्सिको यांच्यातील विजेत्याशी होईल.

### अपराजित मालिका कायम

नॉर्वे आणि ब्राझील यांच्यातील ही पाचवी लढत होती. याआधी झालेल्या चार सामन्यात नॉर्वेने दोन सामने जिंकले होते, तर दोन सामने बरोबरीत सुटले होते. यात १९९८च्या वर्ल्डकप स्पर्धेत गट फेरीत नॉर्वेने ब्राझीलला दणका दिला होता. अपराजित राहण्याची ही मालिका कायम ठेवत नॉर्वेने इतिहास रचला आहे.

# पाकिस्तान कसोटी संघाचे कर्णधारपद पुन्हा बाबरकडे

**मसूदचा पत्ता कट**

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**



वेस्ट इंडिज आणि इंग्लंड दौऱ्यावरील कसोटी मालिकेसाठी पाकिस्तानचा संघ घोषित करण्यात आला आहे. शान मसूदला कर्णधारपदावरून हटवून माजी कर्णधार बाबर आझम याच्याकडे पुन्हा एकदा संघाची धुरा सोपवण्यात आली आहे.

नुकतेच बांगलादेशकडून झालेल्या क्लिन स्वीपनंतर मसूदला कर्णधारपदावरून हटवण्यात आले. मसूदच्या नेतृत्वाखाली बांगलादेशने दुसऱ्यांदा पाकिस्तानला क्लिन स्वीप दिले. याशिवाय ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेकडूनही पाकिस्तानला पराभवाचा सामना करावा लागला. मसूदच्या आधी बाबरच पाकिस्तानचा कर्णधार होता, मात्र बाबर स्वतः सध्या कसोटी क्रिकेटमध्ये खराब फॉर्मशी झगडत आहे.

पाकिस्तान संघ या महिन्याच्या शेवटी दोन कसोटी सामने खेळण्यासाठी आधी वेस्ट इंडिजचा दौरा करणार आहे. पहिली कसोटी २५-२९ जुलैदरम्यान तारुबा येथे, तर दुसरी कसोटी २-६ ऑगस्टदरम्यान पोर्ट ऑफ स्पेन येथे खेळवली जाईल. यानंतर संघ तीन सामन्यांच्या मालिकेसाठी इंग्लंडला रवाना होईल. इंग्लंडविरुद्धचे सामने १९ ऑगस्ट ते १३ सप्टेंबरदरम्यान लीड्स, लॉर्ड्स आणि बर्मिंगहॅम येथे होणार आहेत.

# टी-२० रँकिंगमध्ये टीम इंडियाची घसरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाच्या सलग पराभवाचा थेट फटका आता आयसीसी क्रमवारीत बसल्याचे दिसून येत आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाला गेल्या चार आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांमध्ये एकही विजय मिळवता आलेला नाही. या सुमार कामगिरीमुळे रँकिंगमध्ये भारतीय संघाच्या रेटिंग गुणांमध्ये घसरण झाली असून दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंड संघाने भारतासोबतचे अंतर कमालीचे कमी केले आहे.

नियमित कर्णधारांच्या अनुपस्थितीत श्रेयस अय्यरकडे संघाची धुरा सोपवण्यात आली असली, तरी कर्णधार म्हणून आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पहिल्या विजयासाठी त्याला अजूनही प्रतीक्षा करावी लागत आहे. भारतीय संघ आयर्लंड दौऱ्यावर गेला, तेव्हा संघ ही मालिका सहज जिंकेल अशी आशा होती, मात्र पहिल्याच सामन्यात भारताला पराभवाचा धक्का बसला. त्यानंतर दुसऱ्या सामन्यातही पराभव पत्करावा लागल्याने टीम इंडियावर नामुष्की ओढवली.



आयर्लंडच्या दौऱ्यानंतर भारतीय संघाचा इंग्लंड दौरा सुरू झाला. या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे अनिर्णित राहिला, तर दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने भारताचा चार गडी राखून पराभव केला. अशा प्रकारे श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळलेल्या गेल्या चार सामन्यांपैकी तीन सामन्यांत भारताला पराभव स्वीकारावा लागला आहे, तर एक सामना पावसामुळे रद्द झाला आहे.




# अमेरिकेच्या खेळाडूचे निलंबन रद्द

**न्यूयॉर्क** : अमेरिकेचा खेळाडू फोलारिन बालोगनला बोस्निया हर्झेगोविनाविरुद्धच्या लढतीत रेड कार्ड दाखवण्यात आले. रेड कार्ड नियमानुसार त्याच्यावर एका सामन्यापुरती बंदी आली. यामुळे अमेरिकेच्या बेल्जियमविरुद्धच्या लढतीत तो खेळू शकणार नाही हे स्पष्ट झाले. हा प्रकार लक्षात येताच वर्ल्डकपच्या यजमान देशाचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट फिफाचे प्रमुख जिआनी इन्फॅन्टिनो यांना कॉल केला आणि खेळाडूचे निलंबन रद्द झाले. यामुळे ट्रम्प यांच्यावर टीका होते असून जोरदार ट्रोलिंगही होत आहे.

# डॅनी व्याट हॉजची ऐतिहासिक कामगिरी

**लंडन : वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियाविरुद्ध महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात इंग्लंडच्या डॅनी व्याट हॉजने एक चौकार लगावताच मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. महिला टी-२० विश्वचषकाच्या एका आवृत्तीत ३०० धावांचा टप्पा गाठणारी ती जगातील पहिली खेळाडू ठरली आहे.

डॅनीने ऑस्ट्रेलियाची स्टार फलंदाज बेथ मूनीचा सहा वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला आहे. यापूर्वी टी-२० विश्वचषकाच्या एकाच आवृत्तीत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम बेथ मूनीच्या नावावर होता. तिने २०२०च्या टी-२० विश्वचषकात सहा सामन्यांत एकूण २५९ धावा केल्या होत्या. ऐतिहासिक कामगिरी करण्यासाठी डॅनीला अंतिम सामन्यात केवळ सहा धावांची गरज होती. इंग्लंडच्या डावातील चौथ्या षटकात तिने आपली सहावी धाव पूर्ण करताच तिने स्पर्धेच्या इतिहासात आपले नाव सुवर्णअक्षरांनी कोरले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com